**सांगोला :** सांगोला विधानसभा मतदारसंघातील शेतीपंपाला पुरेशा दाबाने वीजपुरवठा व्हावा म्हणून सांगोला विधानसभा मतदारसंघातील 38 ट्रान्सफॉर्मरसाठी अडीच कोटींचा निधी मंजूर झाल्याची माहिती तालुक्याचे आमदार शहाजी पाटील यांनी दिली. जिल्हा नियोजन समितीतून 38 नवीन व अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर साठी दोन कोटी 50 लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. परिणामी शेतीसाठी पुरेशा दाबाने वीजपुरवठा होणार आहे. चिकमहुद, मुळे वस्ती, टिंगरे वस्ती, जुनोनी ढोले वस्ती आदी ठिकाणांचे ट्रान्सफॉर्मर बसवण्यासाठी हा निधी वापरला जाणार असल्याचे सांगितले.

### स्वेरीच्या नेहा झिरपे या बुद्धिबळ स्पर्धेत तृतीय

# स्वेरीचे तंत्रशिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रात देखील यश


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट ही संस्था शिक्षणात विविध प्रयोग राबवून विद्यार्थ्यांना गुणवत्तेला अधिक परिपक्व बनवत आहे हे सर्वश्रुत आहे. आता स्वेरी ही तंत्रशिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपला दबदबा निर्माण करत आहे. हे मागील काही वर्षांपासून विविध क्रीडा स्पर्धाच्या माध्यमातून दिसून येत आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत बेलाटी येथील बी.एम.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये आयोजिलेल्या विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या नेहा सुरेश झिरपे यांनी ७० मुलींमधून तृतीय क्रमांक पटकावला. साऊथ झोनसाठी होणाऱ्या स्पर्धेसाठी नेहा झिरपे आता पात्र ठरल्या आहेत. तसेच त्यांना क्रीडा महोत्सवामध्ये सुद्धा सहभाग होण्याची संधी मिळाली आहे. या विजयामुळे डिसेंबर २०२४ मध्ये गडचिरोली येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी नेहा झिरपे यांची निवड झाली आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांची खेळासाठी सर्व विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच सातत्याने प्रेरणा मिळत आहे, याचाही फायदा झिरपे यांना झाला. शिक्षणाबरोबरच झिरपे यांनी खेळाकडे लक्ष देवून, परिश्रम केले आणि यशाला गवसणी घातली. झिरपे यांना क्रीडा प्रशिक्षक दीपक भोसले व मार्गदर्शक प्रा.संजय मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी स्वेरीमध्ये शिक्षणाबरोबरच नियमित योगा करून घेतला जातो स्वेरीमध्ये अत्याधुनिक सुविधा असलेल्या स्वतंत्र जिमची देखील सोय आहे, याचा विद्यार्थ्यांना नेहमीच फायदा होतो. सांघिक बुद्धिबळ स्पर्धेमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या सई प्रमोद मोरे व प्रियांका धनाजी चव्हाण व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या जुई अमोल गवसाने यांनी देखील दहा संघांमध्ये तृतीय क्रमांक पटकावल्यामुळे त्या आंतरविद्यापीठ स्तरांमध्ये सहभागी होणार आहेत. बुद्धिबळ स्पर्धेत यशस्वी झाल्यामुळे स्वेरीच्या वतीने नेहा झिरपे, सई मोरे, प्रियांका चव्हाण व जुई गवसाने यांचा स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यशस्वी स्पर्धकांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी मध्ये असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

## गळफास घेऊन इसमाची आत्महत्या



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जगजीवन राम झोपडपट्टी येथील राहत्या घरी लाकडी वाशाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन - इसमाने आत्महत्या केली. हा प्रकार - गुरुवारी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास - घडला. अरविंद दत्ता चव्हाण (वय ३३) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. अरविंद चव्हाण लटकलेल्या - स्थितीत आढळून आल्याने त्याला नातेवाइकांच्या साहाय्याने खाली उतरवण्यात आले. उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. याची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## » Selected

## नवरात्र उत्सवासाठी सोलापूर महापालिका यंत्रणा सज्ज



**सोलापूर :** शारदीय नवरात्र उत्सवा 2024 व धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त करिता सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल उगले यांच्या निर्देशानुसार इंद्रभवन येथील मीटिंग हॉल येथे नवरात्र उत्सव धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त उपाययोजना करण्यासंदर्भात सर्व खाते प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी नवरात्र उत्सवासाठी महापालिका यंत्रणा सज्ज असल्याची खात्री करण्यात आली. त्याचबरोबर आवश्यक तेथे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सूचना देण्यात आल्या. याप्रसंगी उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित आदी उपस्थित होते.

## राष्ट्रवादीने शहर मध्य विधानसभा लढवावी



**सोलापूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापुरातील नेते इरफान शेख यांनी भेट घेऊन आगामी विधानसभा निवडणुकीत शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीने लढवावी अशी विनंती केली. यावेळी चर्चा करताना अजितदादा म्हणाले, शहर मध्य विधानसभा आपल्याला लढायची आहे. पक्षाचे काम सुरू ठेवा.

## भाजपाकडून उत्तरमधून उमेदवारी मिळावी



**सोलापूर :** सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीकडून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी लिंगायत समाजाचे नेते तथा माजी नगरसेवक जगदीश पाटील यांनी भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्याकडे उमेदवारी मिळावी यासाठी निवेदन देऊन मागणी केली. याप्रसंगी पक्षाचे प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पावसामुळे २४ हजार हेक्टरवरील पिके धोक्यात

**सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुक्यात खरीप हंगामातील पिकांची सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील २४ हजार ७७५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे उत्तर तालुक्यात शेतकऱ्यात



मोठे चिंतेचे वातावरण आहे. उत्तर सोलापूर तालुक्यात खरीप हंगामात सोयाबीन, तूर, मूग, मटकी, कांदा, मका आदी पिके घेतली जातात. सध्या सोयाबीन, मूग, मटकी आदी पिके काढणीला आली असताना सततच्या पावसाने मात्र पिकांचे नुकसान होत आहे. तसेच जमिनीतील ओल हटत नसल्याने कांद्याचे पीक ही पिवळे पडू लागले आहे.

## बापूराव सिद व सोपान टेळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य आट्यापाट्या स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** माळशिरस सिदाचीवाडी येथे बापूराव सिद व सोपान टेळे यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य आट्या-पट्ट्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम बक्षीस श्रीकृष्ण तालीम मंडळ शिरढोण यांनी पटकावले आहे. यातील दुसरे बक्षीस जय बिरोबा कचरेवाडी तिसरे बक्षीस जय हनुमान तांदळवाडी चौथे बक्षीस श्रीराम पेहे पाचवे बक्षीस जय शिवशक्ती नेवरे सहावे बक्षीस श्रीराम आट्यापाट्या संघम या संघाने पटकावले आहेत. या सामन्याचे उद्घाटन माळशिरस पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. घोळकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माळशिरस नगरपंचायत चे माजी उपनगराध्यक्ष डॉक्टर मारुतीराव पाटील. रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष एडवोकेट सोमनाथ अण्णा वाघमोडे. माजी नगराध्यक्ष शिवाजीराव देशमुख जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य पांडुरंग वाघमोडे नगरसेवक कैलास वामन नगरसेवक आजिनाथ वलकुंदे नगरसेवक रघुनाथ चव्हाण नगरसेवक दादा शिंदे मनसे तालुकाध्यक्ष सुरेश टेळे माजी नगराध्यक्ष आकाश काका सिद डॉक्टर संजय सिद चेअरमन शामराव वाघमोडे रशीद भाई शेख एडवोकेट दादासाहेब पांढरे मोहन टेळे गोपाळ सिद बाळासाहेब वाघमोडे आगतराव सिद धुळदेव टेळे भिवाजी टेळे संपत वाघमोडे राजाभाऊ टेळे विठ्ठल टेळे लक्ष्मण सिद हनुमंत सिद दत्तात्रय सिद आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बाबाजी टेळे धुळदेव सिद किशोर सिद सचिन टेळे शैलेश टेळे आदेश टेळे. तुषार (पांडुरंग) सिद भाऊसाहेब टेळे अमोल सिद दीपक टेळे अण्णा सिद नितीन टेळे बापूराव टेळे भीमराव टेळे सचिन सिद जगन्नाथ वगरे आजिनाथ टेळे अण्णा बबन सिद संदीप टेळे चेतन्य टेळे मधुकर लवटे तुषार सिद अण्णा सिद दीपक पांढरे गोरख साठे दादा साठे शेखर टेळे सुरेश सिद आजिनाथ सिद राजाभाऊ ठवरे आदींनी परिश्रम घेतले.

## स्पर्धा...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



» **माळशिरस :** माळशिरस सिदाचीवाडी येथे बापूराव सिद व सोपान टेळे यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य आट्या-पट्ट्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम बक्षीस श्रीकृष्ण तालीम मंडळ शिरढोण यांनी पटकावले आहे.

## विषारी द्रव प्राशन केलेल्या तरुणाचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** राजेश्वर नगर बाळे येथील राहत्या घरी अज्ञात कारणावरून विषारी द्रव प्राशन केलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान शुक्रवारी सकाळी मृत्यू झाला. अविनाश शामराव कुंभार (वय २९, रा. राजेश्वरनगर) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास विषारी औषध प्राशन केले होते. त्रास होऊ लागल्याने त्याला उपचारासाठी वडील शामराव कुंभार यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्याचा शुक्रवारी मृत्यू झाला. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलिस करीत आहेत.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

गोपाळ क्लॉथ सेंटर




पत्ता- महाव्दार चौक, पंढरपूर (फोन नं.०२१८६-२२३१३३)

## राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी मोहोळचे पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** राज्यमंत्री पदाचा दर्जा असलेल्या राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी मोहोळचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (अजित पवार गट )चे सर्वेसर्वा नेते, राजन पाटील अनगरकर यांची निवड करण्यात आली आहे. राज्य सहकारी परिषदेची पुनर्रचना करण्याचा निर्णय राज्य शासनाने आज घेतला .त्यानुसार सहकार चळवळीतील प्रदीर्घ अनुभव असलेले माजी आमदार राजन पाटील यांची निवड करण्यात आली आहे .महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील १५४ (अ) (१) कलमान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेवर त्याचीनिवड करण्यात आली . राजन पाटील यांचा अध्यक्ष पदाचा कार्यकाल दि. २७ सप्टेंबर २०२४ पासून ३ वर्षे अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल तोपर्यंत राहील.असेही ते आदेशात म्हटले आहे .राज्यातील सहकारी संस्थांच्या कार्याचा समन्वय साधण्याचा मार्ग सुचवणे, सहकारी चळवळीशी संबंधित अशा सर्व बाबींवर राज्य सरकारला योग्य सल्ला देणे , सहकारी चळवळीचा आढावा घेणे व सहकारी संस्थांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मार्ग व उपाय सुचविणे राज्य सरकार परिषदेकडे निर्देशित करेल अशा सर्व बाबींवर राज्य सरकारला अहवाल देणे, राज्यातील सहकारी चळवळीच्या विकासाबाबतच्या योजना व धोरणे यासाठी शिफारस करणे, खास करून समाजातील मागासवर्गीय व आर्थिक दृष्ट्यां मागास वर्गाच्या विकासासाठी असलेल्या सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठी असलेल्या विद्यमान परियोजनांचे मूल्यांकन करणे व नवीन परियोजना सुचविणे. विभागामार्फत किंवा खास स्थापन केलेल्या मंडळामार्फत कोणत्याही प्रयोजनासाठी अभ्यास करण्याचे काम हाती घेणे आधी मुद्द्यांचा समावेश असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे .सहकार क्षेत्रात त्यांचा अनुभव आणि योगदान लक्षात घेता ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. स्वतः तीन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले राजन पाटील यांनी यापूर्वी महाराष्ट्र राज्य पंचायत राज समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. सहकार क्षेत्रात, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्षपद, संचालक म्हणून देखील काम पाहिलेले आहे. त्याचबरोबर त्यांनी विविध सहकारी संस्थांना उभारी देण्याचे काम केले आहे. त्यांच्या वडिलांनी स्थापन केलेल्या मोहोळ नागरी सहकारी पतसंस्थेची आज जिल्ह्यातील एक अग्रगण्य पतसंस्था म्हणून अशी ओळख राजन पाटील यांच्या नेतृत्वामुळे च आहे.परिषदेच्या अध्यक्ष पदाला राज्यमंत्री पदाचा दर्जा असल्याने सोलापुर जिल्ह्यात राष्ट्रवादी (अजित पवार गट) मध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. सहकार चळवळीत नवी दिशा आणि विकासाची संधी राजन पाटील यांच्या नेतृत्वात अपेक्षित आहे. त्यांच्या निवडीमुळेमोहोळ तालुक्यात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. मात्र आगामी निवडणुकांचीवेळ बघता राजन पाटील यांना काम करण्यास किती काळ मिळेल याची चर्चा सुरू झाली आहे .

### मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांच्या विरोधात

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे राज्याचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी केले आरोप

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** गोरगरीब शेतकऱ्यांनी कष्टाच्या घामाच्या पैशातून उभा केलेला लोकनेते सहकारी साखर कारखाना स्वतःची प्रॉपर्टी समजून हडप करणाऱ्या व्यक्तीलाच राज्य सहकार परिषदेचा अध्यक्ष करणे म्हणजे सहकार चळवळीची चेष्टा केल्या सारखी आहे .असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (अजित पवार गट )चे राज्याचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत केला .

मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांची निवड महाराष्ट्र राज्य शासनाने राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्ष पदी जाहीर केल्यानंतर उमेश पाटील यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते . पुढे बोलताना उमेश पाटील म्हणाले की राजन पाटील यांना सहकार बुडविण्याचा अनुभव आहे. ते डीसीसी बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी योग्य तारण न घेता ज्यांना कर्ज दिले ते कर्ज न भरणारे निघाले. सहकार परिषदेचा उददेश राज्यातील सहकारी संस्थाच्या अडीअडचणी सोडवणे सहकारी संस्थांचे बळकटीकरण करणे सहकारी संस्थांचा



समन्वय साधणे त्यांना कार्पोरेट संस्थांच्या बरोबरीने आणणे हा उदेश आहे . परंतु -सहकारी संस्था खाजगी आणि व्यक्तिगत प्रॉपर्टी कशी करायची याचेच मार्गदर्शन राजन पाटील यांचे कडून राज्यातील सहकार संस्थांना अपेक्षित आहे का? असा उपरोधिक सवाल उमेश पाटील यांनी केला.

पक्षात माझे ऐकलं जात नाही हे खरे आणि दुर्दैवी बाब आहे. पण मी मोहोळ तालुक्याच्या जनतेसोबत आहे. आणि राजन पाटील स्वतः तीन वेळा आणि राखीव जागेवर ३ वेळा त्यांनी दिलेला उमेदवार विजयी झाला. त्यामुळे पक्षाला असे वाटत असेल की राजन पाटील हेच जास्त प्रभावी आहेत. मात्र अप्पर तहसिलच्या निर्णयांच्या विरोधात परवा झालेल्या अजित दादांच्या यात्रेच्या वेळी मोहोळ शहर व तालुका कडकडीत बंद पाळून त्यांच्या विरोधात तालुका जिल्हा हे दाखवून दिले. मी मुख्य प्रवक्ते पदाचा राजीनामा घेऊन वरिष्ठांकडे गेलो होतो पण पक्षाचे वरिष्ठ युवा नेत्यांनी मला थांबायला सांगितले त्यामुळे मी राजीनामा पत्र बंद पाकीटात ठेवून दिलाय असे ते म्हणाले.

पंढरी संचार

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा 20 वा युवा महोत्सव वडाळा येथील लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय येथे होणार असून मंगळवार, दि. 1 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी दिली. मंगळवारी सकाळी दहा वाजता केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आ. सुभाष देशमुख उपस्थित राहणार आहेत.

## मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त कर्तव्यनिष्ठ सेवा पुरस्काराचे वितरण

## मराठा सेवा संघाने समता, संस्कार,समन्वय आणि संस्कृती जपली : हभप जयंत बोधले महाराज

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** मराठा सेवा संघाने समाजात समता, संस्कृती, समन्वय आणि संस्कार रुजवले, वारकरी संप्रदायाचा समतेचा विचार पुढे घेऊन जाण्याचा हा प्रयत्न आहे. कोणताही पुरस्कार हा त्या व्यक्तीने केलेल्या कार्याची पावती असतो आणि यातून त्या व्यक्तीला आणखी कार्य करण्याची प्रेरणा मिळावी हा एक हेतू पुरस्कार देण्यामागे असतो, असे प्रतिपादन हभप जयंत महाराज बोधले यांनी केले.

मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त पंढरपूर मराठा सेवा संघाने विविध क्षेत्रातील मान्यवरांना कर्तव्यनिष्ठ सेवा पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावेळी खा. प्रणितीताई शिंदे प्रामुख, मराठा सेवा संघाचे जिलाध्यक्ष अमित निमकर, एम एन गायकवाड, शाहीर राजेंद्र कांबळे, सुनील वाघमारे, किरण घाडगे, मनीषा जाधव आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी खा. प्रणिती शिंदे आणि हभप जयंत बोधले यांच्या हस्ते सौ. संगीता पाटील ,विनायक नलवडे, समीर कुंभार, धनंजय देशमुख,आनंद जगताप , नवनाथ पोरे , सूर्यकांत मोरे , मंजुषा घावटे , सुधीर चव्हाण, डॉ. शुभांगी तनपुरे ,दिनेश चांदणे ,प्रताप परकाळे यांना सन्मानचिन्ह, प्रशस्ती पत्र शाल, पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी पुढे बोलताना हभप बोधले म्हणाले कि, मराठा सेवा संघाने हे पुरस्कार देताना कर्तव्य निष्ठ व्यक्तींना हेरून,अनेक क्षेत्रातील गुणवंतांना एकत्र केले आहे.आजच्या काळात एकत्र येऊन एकरूप होण्याची आवश्यकता आहे. अलीकडे माणसे खूप कलुशित झालेली आहेत, अशा परिस्थिती चांगल्या माणसांना एकत्र आणण्याची गरज आहे, चांगले समाज मन घडवण्याचे कार्य मराठा सेवा संघाने केले. मराठा सेवा संघाने मानवता शिकवली, मानवता जपली.

यावेळी खा. प्रणिती शिंदे यांनी मराठा सेवा संघाच्या कार्याचा गौरव केला. संविधानामुळेच देशातील द्रौपदी मुर्मू, के आर नारायणन, ए पी जे अब्दुल कलाम यांच्यासारखे राष्ट्रपती होऊ शकले. आमच्या सारख्या महिला संसदेत आणि विधानसभेत सामान्य भारतीयांचा आवाज होऊ शकलो. आज देशात संविधान बाजूला सारून सत्ता राबवण्याचा प्रयत्न चालू आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा एक वर्षाच्या आत कोसळतो इथपर्यंत व्यवस्था भ्रष्ट झालेली आहे. तो छत्रपतींचा तो पुतळा पोकळ होता असाच पोकळ कारभार राज्यातील सरकारचा असल्याची टीका केली. सुत्रसंचलन आगतराव भोसले. अध्यक्ष नितीन जाधव, सचिव नितीन आसबे, सुभाष तनमोर , सतिश रकटे, धनाजी मस्के, भारत विधाते, नितीन पाटील, प्रफुल्ल गोडसे, हनुमंत भोसले, मकरंद रणदिवे, गजेंद्र भालके, राजकुमार भोसले आदींनी परिश्रम घेतले.

## पुतण्याचा बबनदादा शिंदे यांच्यावर गंभीर आरोप



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** माझ्या आजोबांना स्वर्गीय शंकराव मोहिते- पाटलांनी इंदिरा गांधींकडून तिकीट मिळवून देऊन आमदार केले. त्यानंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, स्व. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी आ. बबनदादा शिंदे यांना अपक्ष निवडणूक लढवायला लावून मोठी मदत केली. खा. धैर्यशील मोहिते-पाटलांना मी भेटायला गेल्यानंतर मी गद्दारी केल्याचा कुटुंबातून आरोप करण्यात आला. मात्र, माझे काय चुकले, असा सवाल माढा वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष धनराज शिंदे यांनी चुलते आमदार बबनराव शिंदे यांना जाहीर सभेतून केला आहे.

Selected

## बार्शीचा मतदारसंघ काँग्रेसकडे घेण्याची मागणी



**बार्शी :** जागावाटपात बार्शी विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाला घेण्याची प्रकाश घाले , सुरेश शेट्टी, जीवनदत्त आरगडे आणि अन्य सहकारी यांच्यासमवेत टिळक भवन येथे भेट घेतली. जागावाटपात बार्शी विधानसभा मतदार संघ हा काँग्रेस पक्षाला मागण्याचा आग्रह केला. २००४ चा अपवाद वगळता कधीही काँग्रेस विरोधी आमदार बार्शी मधून निवडून आलेला नाही. नेहमी धर्मांध शक्तीच्या देशविघातक शक्ती विरुद्ध बार्शी मतदार संघ उभारला आहे. जागा वाटपात हा मतदारसंघ काँग्रेसकडे घ्यावा अशी मागणी करण्यात आली.

## माळशिरस मधील स्ट्राँग रुम इतरत्र हलवल्यास तीव्र आंदोलन करु- डॉ. आप्पासाहेब देशमुख

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** माळशिरस येथील स्ट्रॉंग रूम इतरत्र हलवण्याबाबत

> ● माळशिरस येथील स्ट्रॉंग रूम इतरत्र हलवण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. माळशिरसकरांच्या भावना लक्षात घ्याव्यात आणि जर असे झाले तर माळशिरसचे ही परंपरा कायम ठेवण्यासाठी आम्ही लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करणार आहे. तसेच माळशिरस बंदची हाक सुद्धा आम्ही देत आहोत व लवकरच प्रांताधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या विरोधात हायकोर्टात याचिका दाखल करू करून न्याय मागणार आहेत.
>
> **डॉ. आप्पासाहेब देशमुख,** माजी नगराध्यक्ष माळशिरस नगरपंचायत

प्रांताधिकाऱ्यानी नुकतेच बैठक घेतली त्यावरून जर माळशिरस मधील हे स्ट्रॉंग रूम इतरत्र हलवल्यास तीव्र आंदोलन करू असे माळशिरस ग्रामस्थांनी म्हटले आहे . 1952 सालापासून माळशिरस मध्ये निवडणुका पार पडत आहेत. आजपर्यंत निवडणुकांची मतमोजणी ही माळशिरस मध्येच झाली. आतापर्यंत या ठिकाणी कोणताही प्रकार घडलेला नाही त्यामुळे हे वेगळेच षडयंत्र नाही का? असे ग्रामस्थांना वाटत आहे

तालुक्याच्या दृष्टीने माळशिरस हे मध्यवर्ती ठिकाण आहे. माळशिरस येथे शासकीय जागाही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याशिवाय निवडणुकीच्या मतमोजणीसाठी जुनी तहसील कार्यालयाजवळ गोदाम बंदिस्त आहे तसेच माळशिरस म्हसवड रोडवर ही एक अद्यावत गोदाम उपलब्ध आहे .त्यामुळे निवडणुकीच्या कामासाठी कोणतीही अडचण नसताना अधिकाऱ्यांनी हे स्ट्रॉंग रूम इतरत्र ठिकाणी हलवण्याचा अट्टाहास कशासाठी? असा प्रश्न उपस्थित ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. जर स्ट्रॉंग रूम हलवण्याचा निर्णय झाल्यास प्रशासनाला तीव्र आंदोलनाचा सामना करावा लागणार असे ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे .

## प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांची सिनेट व मॅनेजमेंट कौन्सिल पदी निवड झाल्या बद्दल सत्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या सिनेट व मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा उमा शिक्षण संकुलाचे कार्यवाह, माजी प्राचार्य डॉ मिलिंद परिचारक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आय क्यू एसी मेंबर मा.मिलिंद वाघ, उद्योजक महेश आराध्ये, आय क्यू एसी कॉर्डिनेटर प्रा. अविनाश देशपांडे,अधीक्षक सूर्यकांत पारखे तसेच आय क्यू एसी विभागातील सदस्य उपस्थित होते.

## आ. आवताडे यांच्या माध्यमातून 50 लाखांचा निधी मंजूर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नातून जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंगळवेढा तालुक्यातील निंबोणी येथे पशुसंवर्धन दवाखान्यासाठी 50 लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. या निधीची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून लवकरच या दवाखान्याच्या कामाचे टेंडर होणार आहे. या अगोदर आमदार आवताडे यांनी हुन्नूर येथील पशुसंवर्धन दवाखान्याच्या आरोग्यविषयक व इतर भौतिक सोयी सुविधांसाठी 50 लाख रुपये मंजूर केल्याने येथील पशुपालक व संबंधित आरोग्य विभाग यांची चांगली सोय झाली आहे.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या सिनेट व मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा उमा शिक्षण संकुलाचे कार्यवाह, माजी प्राचार्य डॉ मिलिंद परिचारक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आय क्यू एसी मेंबर मा.मिलिंद वाघ, उद्योजक महेश आराध्ये, आय क्यू एसी कॉर्डिनेटर प्रा. अविनाश देशपांडे,अधीक्षक सूर्यकांत पारखे तसेच आय क्यू एसी विभागातील सदस्य उपस्थित होते.

## उमा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** उमा महाविद्यालय पंढरपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत दिनांक 28 सप्टेंबर रोजी उमा महाविद्यालय परिसर व दत्तनगर परिसर या ठिकाणी वृक्षारोपण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ.धीरजकुमार बाड यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना," वृक्षारोपण केल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक झाड दत्तक घेऊन त्याचे संवर्धनही करणे गरजेचे आहे". असे प्रतिपादन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.लोखंडे एन एस,प्रा.सौ.खिलारे एस डी यांनी परिश्रम घेतले याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. हजारे एस.डी, प्रा. ढवन ए ए , प्रा.भगरे एस व्ही, प्रा. बनसोडे ए.डी, महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माढा मतदारसंघातून हे उमेदवार इच्छुक

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** लोकसभेला 52 हजाराच्या लीडमुळे आता तुतारी घेण्यासाठी जोरदार रस्सीखेच सुरु झाली आहे. यात शिवतेसिहं मोहिते पाटील, शिवाजी कांबळे, अभिजित पाटील, संजय कोकाटे, धनराज शिंदे, माढ्याच्या नगराध्यक्ष मीनल साठे , संजय पाटील घाटणेकर, नितीन कापसे, असे अनेक दिग्गज रिंगणात उतरले आहेत त्यातच आता परिचारक गटाने उमेश परिचारक यांनी माढातून निवडणूक लढवण्याचा आग्रह सुरु केल्याने शिंदे याना हा धक्का असणार आहे. लवकरच उमेदवारी जाहीर होणार असल्याने कोणाला लॉटरी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये )

जा. क्रं.4237 दि. 28/09/2024

रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

### जाहीर नोटीस

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

लवाद अर्ज क्रमांक / सामनेवाला क्रमांक / सामनेवाला यांचे नांव व पत्ता

३६८६/२०२४
**कर्जदार श्री/श्रीमती-पल्लवी दत्ता कोरे**
रा.१२२२,भाजी मार्केट गांधी रोड, पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर
**जामीनदार श्री/श्रीमती-राधिका सिद्धनाथ माने**
रा.घर नं.३०४१,कैकाडी महाराज मठाजवळ,पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर
**जामीनदार श्री/श्रीमती -पल्लवी उमेश राऊत**
रा. १२९७,लोणार गल्ली,पंढरपूर, ता.पंढरपूर,जि.सोलापूर

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ५/१०/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

**सही/-**
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**

**लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये )

जा. क्रं.4237 दि. 28/09/2024

रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

### जाहीर नोटीस

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

लवाद अर्ज क्रमांक / सामनेवाला क्रमांक / सामनेवाला यांचे नांव व पत्ता

३५९५/२०२४
**कर्जदार श्री/श्रीमती-दिनेश कुमार दहिहंडे**
रा.१२२२,गवंडीगल्ली,कवठेकर प्रशाला,पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर
**जामीनदार श्री/श्रीमती - विश्वजित विजय व्यवहारे**
रा. ३४२,झेंडेगल्ली,पंढरपूर,ता.पंढरपूर,जि.सोलापूर
**जामीनदार श्री/श्रीमती -प्रमोद हरिष आदलिंगे**

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ५/१०/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

**सही/-**
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**




**लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये )

जा. क्रं.4218 दि. 28/09/2024

रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

### जाहीर नोटीस

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

लवाद अर्ज क्रमांक / सामनेवाला क्रमांक / सामनेवाला यांचे नांव व पत्ता

३६२४/२०२४
**कर्जदार श्री/श्रीमती-मुढे आनंद शिवाजी**
रा.जावळे गल्ली, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर
**जामीनदार श्री/श्रीमती - इंगळे शेखर गणेश**
रा. मुढे गल्ली, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर
**जामीनदार श्री/श्रीमती -घाटुळ रेखा नितीन**
रा. मुरडे गल्ली, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ५/१०/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

**सही/-**
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**

## महाराष्ट्र शासन

**सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,पंढरपूर यांचे कार्यालय**

दूरध्वनी क्रमांक-०२१८६२२३८३३
ई मेल आयडी tmvpppur@gmail.com

जा.क्र.तालपसचि/पं/तां/लिलाव/२३६/२०२४
पंढरपूर, दिनांक २५/०९/२०२४

### लिलाव नोटीस

मा. सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन ता.ल.प.स.चि.पंढरपूर,जि.सोलापूर यांचे कार्यालयातील खालील तपशीलप्रमाणे निरुपयोगी/दुरुस्त न होण्याजोग्या व कालबाह्य झालेल्या तसेच निर्लेखीत केलेल्या वस्तुंचा लिलाव करणेचा आहे. सदरचा लिलाव दिनांक ०४/१०/२०२४ रोजी दुपारी ठिक १५.०० ते १७.०० या वेळेत सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालपसचि,पंढरपूर कार्यालयातील आयोजित केला आहे. तरी इच्छुकांनी लिलावाकरिता वेळेत उपस्थित रहावे. लिलावातील वस्तु लिलावाच्या वेळेपुर्वी एक तास अगोदर पाहवयास मिळतील.

**वस्तुंचा तपशील**

| अ. क्र. | वस्तु/साहित्याचे नांव | नग संख्या | वस्तुची खरेदी किंमत | खरेदी दिनांक | आयुष्यमान संपल्याचा दिनांक | घसारा किंमत रुपये | हातची किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ब्लड अनालयझर हिमॅटोलोजिकल Mubdray Model NO.BC२८०० Vet RR-१४१०१६३० | १ | ३,१८,०००/- | २०/०५/२०११ | २०/०५/२०२१ | २,८६,२००/- | ३१,८००/- |
| २ | बायोकेमिकल ऍनालायझर Acculab-२०१ Sr.No.T१००२१५४ | १ | १,९०,०००/- | ३०/०३/२०१० | ३०/०३/२०२० | १,७१,०००/- | १९,०००/- |

**लिलावाच्या अटी व शर्ती-** १. सदरचा लिलाव जेथे आहे तेथे व जसे आहे तसे या अटीवर करण्यात येईल. २. सर्वात जास्त बोली लावणाऱ्या इसमास लिलावातील वस्तु मिळतील. ३. लिलाव मान्य झाल्यावर योग्य ती रक्कम भरुन लिलावातील साहित्य अर्धा तासाच्या आत घेऊन जाण्याचे आहे. ४. लिलावात भाग घेण्यासाठी रुपये १००/-इतकी अनामत रक्कम भरावी लागेल. लिलाव संपलेनंतर लगेचच ती रक्कम संबंधीतास परत करण्यात येईल. ५.लिलाव साहित्याची विल्हेवाट लावण्याची सर्व जबाबदारी लिलाव घेणाऱ्या व्यक्तीची राहील. सदर विल्हेवाटीच्या कोणत्याही कायदेशीर व प्रदूषण संबंधीत बाबींसाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. ६. लिलाव समितीचा निर्णय अंतिम राहिल तसेच लिलाव प्रक्रिया कोणत्याही वेळी स्थगित करण्याचे अधिकार लिलाव समितीस असतील.

सही/-
(डॉ.राजेंद्रनाथ सोमनाथ सावळकर)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,पंढरपूर

# सिनेमॅटिक

**सेलिब्रिटी कोणताही मग अभिनेता असो, अभिनेत्री किंवा खेळाडू असो तो पडद्यावर आणि मैदानावर पैसे आणि नाव कमवत असतो. परंतु तो लोकप्रियतेच्या शिखरावर पोचला तर त्याचा अधिकाधिक लाभ उचलत कमाईचा नवा मार्गही तयार करतो. लोकप्रियतेच्या बळावर जाहीराती, सांस्कृतिक कार्यक्रम, उद्घाटन सोहळा आदी कार्यक्रमात सहभागी होताना ते जबरदस्त शुल्क वसूल करत असतात. एवढेच काय दहीहंडीच्यां कार्यक्रमात तर या कलाकारांचे भाव आकाशाला भिडलेले असतात. तरीही त्यांना कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी संयोजकांची चढाओढ सुरु असते.**






## लोकप्रियेतला ‘ब्रँड व्हॅल्यू’चा साज!

एखादा कलाकार चित्रपटासाठी आणि ब्रँडच्या करारासाठी, व्यक्तिश: कार्यक्रमासाठी किती शुल्क आकारतात, हे त्यांच्या ब्रँड व्हॅल्यूवर अवलंबून असते. त्याची लोकप्रियता, वलय यावर सगळा खेळ असतो. काहीची ब्रँड व्हॅल्यू वेगाने वाढते तर काहींची कमी होते. चित्रपट चालणे किंवा पडणे तसेच एखादा खेळाडू फॉर्मात असणे किंवा नसणे यावर त्याचे मूल्य ठरलेले असते.

बहुचर्चित हिंदी चित्रपट उडता पंजाब, गुड न्यूज आणि सूरमासह ब्लॉकब्लस्टर पंजाबी चित्रपट ‘जट्ट अँड ज्युलिएट’मध्ये अभिनयाची छाप पाडणारा गायक दिलजित दोसांझ हा लवकरच ‘दिल लुमिनाटी टूर’ करणार आहे. तो देशातील काही शहरात एकानंतर एक मोठे कॉन्सर्ट करत आहेत. काही दिवसापूर्वी त्यांच्या कॉन्सर्टची घोषणा होताच काही वेळातच सर्व तिकीट हातोहात विकले गेले. त्याचवेळी एका तिकीटची किंमत किमान पंधरा हजार रुपये होती. भारतासारख्या देशांत आवडीच्या कलाकारांवर गरजेपेक्षा अधिक प्रेम करणारे चाहते आहेत आणि ते प्रेम अमूल्य आहे. अर्थात दोसांझने कॉन्सर्टसाठी भरभक्कम तिकीट आकारल्याबद्दल सोशल मीडियावरून ट्रोल केले जात आहे.

**लोकप्रियता इनकॅश**

चित्रपट कलाकार यशाला आणि लोकप्रियतेला चांगल्या पद्धतीने इन्कॅश करतात. या कारणांमुळेच बॉलिवूडचा प्रत्येक कलाकार प्रसिद्ध होताच तो मानधनात अनेक पटीने वाढ करतो. त्याला लोकप्रियतेचे पिक दोन्ही हाताने चांगल्या रितीने काढता येते. तरीही बड्या कंपन्या वलयांकित नायक आणि नायिकेशी करार करतात आणि ब्रँड लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करतात. यासाठी ते वाट्टेल ती किंमत मोजण्यासाठी तयार असतात.

सिनेविशेष

प्रसिद्धीचा अधिकाधिक लाभ घेत असल्याचा पुरावा बघायचा झाल्यास २०२३ मध्ये बॉलिवूड सेलिब्रिटीजची ब्रँड व्हॅल्यू १५.५ टक्क्यांनी वाढली असून ती १.९ अब्ज डॉलरवर पोचली. लोकप्रियतेला इन्कॅश करण्यात तरबेज असल्याने कलाकार रणवीर सिंहची ब्रँड व्हॅल्यू अन्य बॉलिवूडच्या कलाकारांपेक्षा कितीतरी पटीने अधिक वार्षिक २०३.१ दशलक्ष डॉलर राहिली आहे. याप्रमाणे शाहरुख खानने देखील त्याचे तीन चित्रपट हिट होताच ब्रँड व्हॅल्यूमध्ये १६.६ टक्क्यांपर्यंत वाढ केली. अशीच स्थिती आलिया भट्टची आहे. तिने तिच्या लोकप्रियतेमुळे जाहीरातीच्या शुल्कात गेल्या वर्षभरात ११९.६ टक्क्यांनी वाढ केली आहे.




**शाहरुख खानची ब्रँड व्हॅल्यू**

बॉलिवूडचा किंग खान शाहरुख खानने अन्य कलाकारांच्या तुलनेत गेल्या दोन तीन वर्षांत चांगली ब्रँड व्हॅल्यू मिळवली आहे. यामागचे कारण म्हणजे त्याचे सलग तीन चित्रपट डंकी, जवान आणि पठाण सुपरहिट ठरणे. ‘डंकी’ने २१२ कोटी, ‘जवान’ने ६४४ कोटी आणि ‘पठाण’ने ५४४ कोटी रुपयांची कमाई केली आणि या बळावर तो पुन्हा आघाडीचा नायक ठरला. मधल्या काळात बऱ्यापैकी कमी फीस घेणारा शाहरुख खान आजकाल पुन्हा एकदा करारासाठी ३.४ ते ४ कोटी रुपये शुल्क आकारतो.

**अप्स डाउनने बदलते ब्रँड व्हॅल्यू**

कोणताही नायक किंवा नायिका असो तो यशाच्या आणि लोकप्रियतेच्या शिखरावर असेल तर त्याची ब्रँड व्हॅल्यू देखील जबरदस्त असते. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे एखाद्या स्टारचा चित्रपट सुपरहिट होत असेल तर त्यावेळी त्याचे मूल्य अचानक वाढत जाते. दोन वर्षापूर्वी एका मुलाखतीत सलमान खानने एका कंपनीच्या ब्रँड करारासाठी ७.५ कोटी रुपये आकारल्याचे सांगितले होते. त्यावेळी सलमान खानचे एकानंतर एक चित्रपट झळकले होते आणि तो बड्या बॅनर्सचे चित्रपटही करत होता. सध्या तो जाहीरातीसाठी कमी पैसे आकारत असेल. कारण पूर्वीच्या तुलनेत त्याचे चित्रपट फार चालत नाहीत.

**वैयक्तिक कार्यक्रासाठी चांगले शुल्क :** चित्रपट कलाकारांना एखाद्या वैयक्तिक कार्यक्रमासाठी बोलावले जाते, तेव्हा अशावेळी तारक-तारका जबर शुल्क घेतात. बॉलिवूडचे अभिनेते किंवा अभिनेत्री वैयक्तिक कार्यक्रमात उपस्थित राहण्यासाठी ५० लाख ते एक कोटीपर्यंत किंवा अनेकदा यापेक्षा अधिक शुल्क घेतात. प्रसिद्ध कलाकार तर अव्वाच्या सव्वा फीस घेतात. शाहरूख खान आणि सलमान खानसारखे कलाकार वैयक्तिक कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्यासाठी दोन ते तीन कोटी रुपये घेतात. विविध सांस्कृतिक आणि वैयक्तिक कार्यक्रमांना सतत हजेरी लावणाऱ्या कलाकारांचे मूल्य हे त्यांच्या लोकप्रियतेवर ठरलेले असते. कमी लोकप्रिय कलाकार साधारणपणे वैयक्तिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी दहा ते ५० लाख रुपयांपर्यतचे शुल्क घेतात. मराठी कलाकार देखील विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नवीन हॉटेल, मॉल, ज्वेलर्सचे अनावरण यासारख्या कार्यक्रमांना उपस्थिती दर्शवितात आणि त्यासाठी बऱ्यापैकी पैसे आकारतात. त्यांचे ब्रँड अम्बेसिडर होऊन संबंधित कंपनीशी करार करत बक्कळ कमाई करत असतात. आजही अमिताभ बचन, सचिन तेंडुलकर, हेमा मालिनी, अनिल कपूर, माधुरी दीक्षित, सनी देवल, अजय देवगण, ऋतिक रोशन यांची ब्रँड व्हॅल्यू दमदार आहे. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की स्वत:ची ब्रँड व्हॅल्यू बाजारातून कशी वसूल करायची आणि चाहत्यांना त्याकडे कसे खेचायचे याचे कौशल्यही कलाकारांना चांगलेच अवगत असते. ◆◆◆

## सहाशे कोटी पार...



स्त्री २’ च्या निर्मात्यांनी असा दावा केला आहे की, राजकुमार राव आणि श्रद्धा कपूर स्टारर हॉरर-कॉमेडी ६०० कोटींच्या कलेक्शनसह घरगुती बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट बनला आहे. ‘स्त्री २’ ने अवघ्या ३९ दिवसांत बॉक्स ऑफिसवर ६०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. ६०० कोटींचा टप्पा पार करणारा हा पहिला हिंदी चित्रपट ठरला आहे. अमर कौशिक दिग्दर्शित हॉरर-कॉमेडी सिक्वेलने कमाईचे सर्व रेकॉर्डच मोडले तसेच भारतीय सिनेमासाठी एक नवा बेंचमार्कही सेट केला आहे. महिनाभरापूर्वी प्रदर्शित झालेला ‘स्त्री २’ अजूनही चित्रपटगृहांमध्ये लोकप्रिय आहे. पाचव्या आठवड्यातही हा चित्रपट विक्रम मोडत आहे. ३९व्या दिवशी चित्रपटाचे भारतातील एकूण नेट कलेक्शन ६०४.२२ कोटी रुपये होते. तर जगभरातील एकूण संकलन ७१३ कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

२०१८ मध्ये रिलीज झालेल्या ‘स्त्री’ या मागील चित्रपटाच्या जबरदस्त यशानंतर, ‘स्त्री २’ देखील त्याच विजयी फॉर्म्युल्याखाली पुढे जात आहे. सस्पेन्स, विनोद आणि अलौकिक घटकांचे अखंडपणे मिश्रण करण्याच्या चित्रपटाच्या क्षमतेने प्रेक्षकांना प्रभावित केले आहे. चमकदार कथा आणि अभिनयामुळे हा आतापर्यंतचा सर्वात यशस्वी हिंदी चित्रपट बनला आहे. चित्रपटाची कथा एका छोट्या शहरात दहशत निर्माण करणाऱ्या ‘भूता’भोवती फिरते. भय आणि विनोद यांचा कुशलतेने समतोल साधत अमर कौशिकने एक मनोरंजक आणि भीतीदायक असा चित्रपट तयार केला आहे. राजकुमार राव, अपारशक्ती खुराना आणि पंकज त्रिपाठी यांच्यासह सहाय्यक कलाकारांच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

‘स्त्री २’ च्या ६०० कोटी रुपयांच्या कमाईने बॉलीवूडच्या इतिहासात त्याचे स्थान निश्चित केले आहे. हा चित्रपट बॉलिवूड इंडस्ट्रीत एक गेम चेंजर ठरला आहे. त्याच्या विक्रमी यशामुळे सिक्वेलची मागणी होत असल्याची चर्चा रंगली आहे. कारण ते अपेक्षा तर पूर्ण करतेच, पण त्यांना मागे टाकते.

रिपोर्टनुसार, ‘स्त्री २’ ने कमाईच्या बाबतीत २०२३ मध्ये रिलीज झालेल्या शाहरुख खानच्या ‘जवान’ला मागे टाकले आहे. ‘जवान’ हा आजपर्यंत भारतीय बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट होता. शाहरुख खान स्टारर या चित्रपटाने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये रिलीज झाल्यानंतर भारतात ५८२ कोटींची कमाई केली होती. ◆◆◆

## ऐश्वर्या शर्माने सुनावले



सोशल मीडियावर अनेक सेलिब्रिटींना ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. परंतु काही जण याकडे दुर्लक्ष करतात. तर काही जण ट्रोल करणाऱ्यांना सडेतोड उत्तर देतात. बिग बॉस १७ फेम ऐश्वर्या शर्माला देखील ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे. मात्र तिनेही एक व्हिडिओ शेअर करत ट्रोल करणाऱ्यांना चांगलेच सुनावले आहे.

या व्हिडिओमध्ये ऐश्वर्या म्हणते, नमस्कार मित्रांनो, मला तुम्हाला एक गोष्ट सांगायची आहे. प्रत्येकाला खोटे बोलणारे लोक आवडतात आणि सरळ तोंडावर सत्य बोलणारे लोक त्यांना वाईट वाटतात. मी देखील त्यांच्यापैकी एक आहे, जी खरे बोलून वाईट होते. आज पुन्हा एकदा मी खूप वाईट बोलणार आहे आणि तुम्हा सर्वांना या गोष्टी ऐकाव्या लागतील. तुम्हा सर्वांना माझ्या आयुष्यावर नियंत्रण ठेवायचे आहे. तुम्ही मला नेहमी संदेश देता की, मी असे करू नये, मी हे केले पाहिजे, मी कोणाशी कसे बोलावे, मी कोणाशी कसे बोलू नये. पण मी तुमच्या या सर्व गोष्टी ऐकणार नाही. ◆◆◆

## अभिषेकचा ‘बी हॅप्पी’

बॉलिवूड अभिनेता अभिषेक बच्चनच्या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. ‘बी हॅप्पी’ असे या चित्रपटाचे नाव आहे. निर्मात्यांनी याचा फर्स्ट लुक शेअर केला आहे. हा चित्रपट ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. अभिषेक बच्चनच्या ‘बी हॅप्पी’ चित्रपटाचे पोस्टर प्राइम व्हिडिओच्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आले आहे.





निर्मात्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टरमध्ये अभिषेक आणि इनायतचा फोटो दिसत आहे. यामध्ये बाप-लेकीची जोडी डान्स करताना दिसत आहे. लियाना डिसूझा, नोरा फतेही, इनायत वर्मा, जॉनी लीव्हर आणि हरलीन सेठी यांसारखे कलाकारही या चित्रपटात दिसणार आहेत.

हा चित्रपट रेमो डिसूझा दिग्दर्शित करत असून रेमो डिसूझाच्या प्रोडक्शन कंपनीची निर्मिती आहे. पोस्टरमध्ये अभिषेक बच्चनसोबत एक मुलगी दिसत असून तो तिच्यासोबत डान्स करताना दिसत आहे. अभिषेकच्या आगामी चित्रपटाची रिलीज डेट अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

दरम्यान, अभिषेक बच्चनचा ‘घूमर’ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. या चित्रपटात सैयामी खेर अभिषेकसोबत दिसली होती. त्यानंतर हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्म नशश५ वर प्रदर्शित झाला. त्यानंतर आता अभिषेकची जादू आगामी चित्रपटात पाहायला मिळणार का? याची उत्सुकता अनेकांना ◆◆◆

## ‘रांझना’च्या सिक्वेलमध्ये झळकणार

आगामी काळात अभिनेत्री तृप्ती डिमरीचे अनेक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विकी विद्या का वो व्हिडिओनंतर ती भूल भुलैया ३ मध्ये दिसणार आहे. अशात आता २०१३ मध्ये रोमँटिक ब्लॉकबस्टर ठरलेल्या ‘रांझना’ चित्रपटाच्या सिक्वेलमध्ये ती दिसणार असल्याची चर्चा रंगली आहे. ‘रांझना’ला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दिग्दर्शक आनंद एल राय यांनी गेल्या वर्षी ‘तेरे इश्क में’ या सिक्वेलची घोषणा केली होती. गेल्या काही दिवसांपासून तृप्तीची वाढती लोकप्रियता पाहता ती या चित्रपटात धनुषसोबत दिसणार असल्याचे बोलले जात होते.



आनंद एल राय यांनी ‘तेरे इश्क में’ मधील तृप्ती डिमरीच्या कास्टिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. मात्र त्यांनी याची पुष्टी करण्यास नकार दिला. ते म्हणाले की, ज्या काही अफवा आहेत, त्या तशा चालू राहू द्या. कास्टिंगबाबत लवकरच नवी घोषणा करणार आहे. आनंदने घोषणा टीझरमध्ये धनुषची पुष्टी केली होती. आता अभिनेत्रीचा खुलासा होणे बाकी आहे.

‘तेरे इश्क में’ची घोषणा गेल्या वर्षी झाली असली तरी अद्याप त्याचे शूटिंग सुरू झालेले नाही. धनुषच्या इतर पूर्वीच्या वचनबद्धतेमुळे त्याचे शूटिंग लांबत आहे. मात्र, आता ऑक्टोबरमध्ये शूटिंग सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आनंदने ‘रांझना’ आणि ‘तेरे इश्क में’ची तुलना केली आहे. ते म्हणाला की फक्त धनुष, एआर रहमान, इर्शाद कामिल आणि हिमांशू शर्मा ही टीम चित्रपटात तशीच राहील, कथा पूर्णपणे वेगळी आहे. आता चाहते सोशल मीडियावर या जोडीची ऑन स्क्रीन केमेस्ट्री पाहण्यास उत्सुक आहे. ◆◆◆

## दमदार कामगिरी

अभिनेत्री अनुष्का सेनने कमी वयात अभिनय क्षेत्रात मोठे यश संपादन केले आहे. याशिवाय तिने केलेल्या दमदार कामगिरीसाठी पुरस्कार देण्यात आला आहे. अनुष्का सेनला कोरिया आणि भारत यांच्यातील संबंध दृढ करण्यासाठी एका प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कमी वयात तिने हा पुरस्कार पटकावला आहे.



ऑनररी एम्बेसिडर ऑफ कोरियन टूरिजमच्या रुपात अनुष्काने कोरिया आणि भारतातील सांस्कृतिक अंतर कमी करण्यासाठी मोठी भूमिका पार पाडली आहे. यासाठी तिला ग्लोबल ओळख मिळाली आहे. याबाबत अनुष्काने पोस्ट करत लिहिले की, ‘तुम्हा सर्वांसोबत आणखी एक खास क्षण शेअर करायला मी उत्सुक आहे. कोरिया आणि भारत यांच्यातील संबंध दृढ करण्याच्या माझ्या प्रयत्नांसाठी, सोल बिझनेस एजन्सीचे सीईओ ह्यून वू किम यांच्याकडून पुरस्कार मिळाल्याचा मला सन्मान वाटतो.

याबद्दल आशियाचे संचालक ली जंग-सब यांचे आभार. घवॲरार मध्ये काम करण्याचे माझे स्वप्न, कोरिया टुरिझम ऑर्गनायझेशनची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती होणे आणि आता कोरिया-भारत संबंध मजबूत करण्यात माझ्या योगदानासाठी ओळखले जाणे हे मला नक्कीच आणखी काही करण्यास प्रेरित करेल.’

याआधी अनुष्का सेन कोरियाच्या बिलबोर्डवर झळकलेली पहिली भारतीय होती. वयाच्या केवळ २२ व्या वर्षी तिने टॅलेंट आणि मेहतनीच्या जोरावर हे यश मिळवलं. नुकतीच ती ‘दिल दोस्ती डिलेमा’ सीरिजमध्ये दिसली. आता ती आगामी ‘आशिया’ या आंतरराष्ट्रीय प्रोजेक्टमध्ये झळकणार आहे. ◆◆◆

# विश्ववेध

# नागवेलीच्या पानांचे आरोग्यलाभ

**आपल्याकडे जेवणानंतर मुखशुद्धीसाठी नागवेलीचे पान खाल्ले जात असते. अगदी देवदेवतांनाही भोजनोत्तर विडा अर्पण केला जातो व पूजेवेळीही ही पाने सुपारीसह ठेवली जात असतात. नागवेली ही वनस्पती पायपरेसी कुळातील असून तिचे शास्त्रीय नाव पायपर बिटल आहे. तिला पानवेल, विड्याची पाने किंवा खाऊची पाने असेही म्हणतात. मिरी ही वनस्पतीही याच कुळातील आहे. नागवेली वनस्पती मुळात भारत, बांगला देश, नेपाळ व श्रीलंका या देशांतील असावी. आशियात तिची पाने मोठ्या प्रमाणावर खाल्ली जातात. भारतासह आशिया खंडातील काही देशांत तिची लागवड केली जाते. उष्ण व ओलसर हवामानात ही वेल चांगली फोफावते. या नागवेलीच्या म्हणजेच विड्याच्या पानांचा आरोग्यासाठीही लाभ होतो. त्याची ही माहिती...**

**पचन सुधारते :** नागवेलीच्या पानांमध्ये आढळणारे एन्झाईम्स पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. ते अन्न पचण्यास सुलभ करते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देते.

**श्वासाची दुर्गंधी दूर करते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले तेल आणि जंतुनाशक गुणधर्म श्वासाची दुर्गंधी दूर करण्यास मदत करतात. तोंड ताजे आणि स्वच्छ राहते.

**दात निरोगी ठेवते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म दात निरोगी ठेवण्यास मदत करतात. हे दातांमध्ये प्लेक आणि पोकळी तयार होण्यास प्रतिबंध करते.

**तणाव कमी करते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले काही घटक तणाव कमी करण्यास मदत करतात. हे मन शांत आणि आरामदायी बनवते.

**खोकला आणि सर्दीपासून आराम :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले काही घटक खोकला आणि सर्दीपासून आराम देण्यास मदत करतात. त्यामुळे श्वसनसंस्था निरोगी राहण्यास मदत होते.



**रक्तदाब नियंत्रित करते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले काही घटक रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.


**त्वचा निरोगी ठेवते :** नागवेलीच्या पानांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. यामुळे त्वचा चमकदार आणि मुलायम होते.

**लक्षात ठेवा :** नागवेलीच्या पानांमध्ये कॅटेकॉल नावाचे तत्त्व असते ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो. त्यामुळे नागवेलीची पाने मर्यादित प्रमाणातच खावीत.

तंबाखूसारख्या पदार्थांमध्ये मिसळून पान खाणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. नागवेलीची पाने गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांनी खाऊ नयेत. नागवेलीचे पान अनेक आरोग्य फायद्यांनी परिपूर्ण आहे, परंतु त्याचे सेवन मर्यादित प्रमाणातच केले पाहिजे.

# आता पेशींची हानी रोखता येणार

सध्याचा जमाना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबो, थ्रीडी प्रिंटिंग आणि नॅनो टेक्नॉलॉजीचा आहे. आरोग्याच्या क्षेत्रातही नॅनो टेक्नॉलॉजी वापरता येऊ शकते हे भारतातीलच वैज्ञानिकांनी दाखवले आहे. व्हॅनाडियापासून तयार केलेल्या नॅनोवायर्स या मानवी शरीरातील पेशींची हानी रोखतात असे बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस येथील वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनात स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे वार्धक्यामुळे होणाऱ्या रोगांवर नवीन उपचार शक्य होऊ शकतात.



हृदयरोग, कंपवात व स्मृतिभ्रंश यांसारखे वार्धक्याबरोबर होणारे रोग यावर नवीन औषधे तयार करणे त्यामुळे शक्य होईल. व्हॅनेडियम ऑक्साईड किंवा व्हॅनाडिया हे व्हॅनाडियमचे एक रूप असून ते आवर्तीसारणीत टिटॅनियमच्या जवळ सापडते. पेशींच्या चयापचय क्रियेत रिॲक्टिव्ह ऑक्सिजन स्पेसीज (आरओएस)ची निर्मिती होते व त्यात वाढ झाल्यास पेशींची नेहमीची रिडॉक्स अवस्था विस्कळीत होते त्यामुळे पेशीतील प्रथिने, मेदाम्ले व डीएनए या घटकांना हानी पोहोचते. आरओएसमुळे ऑक्सिडेटिव्ह ताण निर्माण होऊन आपल्याला अनेक रोग होतात, त्यात कर्करोग, संधिवात, मूत्रपिंडाचे विकार यांचा समावेश आहे. आरओएसवर नियंत्रण ठेवण्यासाठी वापरली जाणारी अनेक औषधे ही कमी प्रमाणात आरओएसची उलट निर्मिती करतात, त्यामुळे नैसर्गिक निर्विषीकरण मार्गाची नक्कल करण्याचा आमचा विचार आहे, असे संशोधन पथकाचे प्रमुख जी. मुगेश व पॅट्रिक डिसिल्व्हा यांनी म्हटले होते. 'नेचर कम्युनिकेशन्स' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार व्हॅनाडिया नॅनोवायर्स या नसश्शक अँटी ऑक्सिडंटची नक्कल करतात. आरओएस हे एका विशिष्ट मात्रेत असेल तर उपकारक असते.


अनेक जैव रासायनिक क्रियात ते दुय्यम संदेशवाहकाचे काम करते व शरीरातील चयापचय क्रिया सुरळीत राहण्यासाठी त्याचा उपयोग असतो. मानवी शरीरात जास्त झालेले आरओएस बाहेर काढण्यासाठी काही यंत्रणा असतात, त्यात हायड्रोजन पेरॉक्साईडचा समावेश आहे. जेव्हा आपल्याला एखादा रोग होतो तेव्हा आरओएसचे प्रमाण वाढते व त्यात नैसर्गिक निचरा होण्याची प्रक्रिया टिकाव धरत नाही, पण आपण कृत्रिम पद्धतीने आरओएसचे नियंत्रण करू शकतो, असे डिसिल्व्हा यांनी म्हटले आहे.

# आकाशगंगा उपाशी मरतेय...

एकेकाळी कृष्णविवरांचे अस्तित्व केवळ सैद्धांतिक रूपात मानले जात असे. काही संशोधकांना तर ते खरोखर अस्तित्वात नसावेत, असेही वाटत होते; मात्र आता त्यांचे अस्तित्व केवळ सर्वमान्यच झालेले आहे असे नाही तर त्यांचे छायाचित्रही टिपण्यात यश आलेले आहे. प्रत्येक आकाशगंगेच्या केंद्रस्थानी एक शक्तिशाली कृष्णविवर असते. प्रचंड आकर्षणशक्ती असलेल्या अशा कृष्णविवरांमध्ये आजूबाजूचे सर्व घटक गडप होत असतात. असे सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल आपल्या यजमान आकाशगंगेतील इंधनही हिसकावून घेऊ शकतात, असे मानले जात होते. त्याची आता जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने पुष्टी केली आहे. या अंतराळ दुर्बिणीने एका अशा कृष्णविवराचा शोध घेतला आहे जे आपल्याच आकाशगंगेतील इंधन खाऊन तिला जणू काही उपाशी मारत आहे!

कृष्णविवराकडून असे इंधन खाल्ले जात असल्याने आकाशगंगेकडे नवे तारे बनवण्यासाठी सामग्री शिल्लक राहत नाही व ती हळूहळू मृत होत जाते, म्हणजेच नष्ट होते. अशीच एक आकाशगंगा 'जेम्स वेब'ने शोधली असून तिला 'जीएस-१०५७८' असे नाव देण्यात आले आहे. या आकाशगंगेला 'पाब्लोची गॅलेक्सी' असेही म्हटले जाते. आपली पृथ्वी व संपूर्ण ग्रहमालिका ज्या आकाशगंगेचा एक भाग आहे त्या 'मिल्की वे' इतकाच तिचाही आकार आहे. ही आकाशगंगा पृथ्वीपासून १२ अब्ज प्रकाशवर्ष अंतरावर आहे. ज्यावेळी ब्रह्मांडाचे वय अवघे २ अब्ज वर्षे होते, त्यावेळी ही आकाशगंगा निर्माण झाली होती.

या आकाशगंगेचे वस्तुमान आपल्या सूर्याच्या वस्तुमानापेक्षा २०० अब्ज पट अधिक आहे. पाब्लोच्या आकाशगंगेत बनलेल्या सध्याच्या बहुतांश ताऱ्यांची निर्मिती १२.५ ते ११.५ अब्ज वर्षांपूर्वी झाली होती. 'नेचर ॲस्ट्रॉनॉमी' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. केम्बिज युनिव्हर्सिटीतील कालवी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्मोलॉजीमधील फ्रांसेस्को डी' यूजेनियो यांनी याबाबतचे संशोधन केले. त्यांनी सांगितले की सुरुवातीच्या निरीक्षणातूनच आम्ही ओळखले होते की ही आकाशगंगा जणू काही विझून गेली आहे. तिच्या आकाराचा विचार करता त्यामध्ये अधिक तारे बनत नाहीत. तिने आपले बहुतांश इंधन गमावले असल्याने नवे तारे बनवण्यासाठी तिच्याकडे आता पुरेशी सामग्री शिल्लक नाही.



# जास्वंदाच्या चहाचे आरोग्यलाभ

जास्वंदाला इंग्रजीत 'हिबिस्कस' या नावाने ओळखले जाते. जास्वंद ही आशिया खंडात आढळणारी सदारहरित वनस्पती आहे. भारतात कित्येक वर्षांपासून जास्वंदाच्या फुलांचा वापर पूजा आणि विधींसाठी केला जातो. जास्वंदाच्या फुलांच्या पाकळ्या सुकवून त्यांचा नैसर्गिक रंग म्हणून वापर केला जातो. पण तुम्हाला माहिती आहे का, बाप्पांच्या आवडत्या जास्वंदाचे आरोग्यासाठीही अनेक फायदे आहेत. विशेषतः जास्वंदाचा चहाही आरोग्यासाठी गुणकारी असतो.

जास्वंदाचा चहा किंवा जास्वंदाचा अर्क हा मेंदूसाठी अत्यंत उपयुक्त असतो. अस्वस्थता जाणवत असेल, रक्तदाबाची समस्या असेल तर त्यावर जास्वंदाचा चहा पिणे अत्यंत उपयुक्त ठरू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. तुम्ही जे पाणी पिता, त्यात जास्वंदाचे परागकण काढून त्याच्या पाकळ्या टाकून ते पाणी प्यायले तर तुमच्या शरीराला चांगले अँटिऑक्सिडंट मिळतात. जर त्वचेच्या समस्या असतील तर जास्वंदाची पावडर, जास्वंदाच्या पाकळ्यांचे पाणी, जास्वंदाचा चहा (हिबिस्कर टी) प्यायल्यास अत्यंत उपयुक्त ठरू शकते. पोटाच्या समस्या असतील तर जास्वंदाचा चहा फायदेशीर ठरू शकतो. कारण तो सहज पचवता येतो.

**जास्वंदाच्या चहाचे आणखी काही फायदे :**


जास्वंदाच्या चहामध्ये शक्तिशाली अँटिऑक्सिडंटस्? भरपूर असतात. ते शरीरातील मुक्त रॅडिकल संयुगाशी लढण्यास मदत करतात. उच्च रक्तदाबामुळे हृदयावर अतिरिक्त ताण पडतो आणि ते कमकुवत होऊ शकते. नैसर्गिक उपायांसाठी जास्वंदाच्या चहाचे सेवन केले जाऊ शकते. परंतु जर एखाद्याला तीव रक्तदाबाचा त्रास होत असेल आणि औषधोपचार होत असतील तर अशा नैसर्गिक उपायांमध्ये सहभागी होण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. रक्तातील फॅटस्चे प्रमाण विविध हृदयविकारांना कारणीभूत ठरू शकते, म्हणून एक कप गरम जास्वंदाचा चहा प्यायल्याने नैसर्गिकरीत्या खराब कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते आणि शरीर आतून लवकर बरे होऊ शकते. जास्वंदाच्या अर्कामुळे कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइडस्? कमी होतात, ज्यामुळे लठ्ठपणाचा धोका कमी होतो. बीएमआय पातळी कमी करणेदेखील फायदेशीर आहे. ज्या लोकांना सतत मूड स्विंग, मळमळ किंवा अस्वस्थता असते, त्यांनी नियमित जास्वंदाचा गरम चहा प्यावा, कारण ते तुमच्या मज्जातंतूंना शांत करते आणि तुम्हाला आराम देते.



# फळमाशांचाही मेंदू असतो तल्लख!

मानवाचा मेंदू म्हणजे निसर्गाची सर्वात थक्क करणारी करामत आहे. मानवाने बुद्धीच्या जोरावरच जगात आपले साम्राज्य बनवलेले आहे. मात्र मानवाशिवायही अनेक जीवांमध्ये त्यांचे जीवनयापन करण्यासाठी योग्य अशी बुद्धी असते. जी फळमाशी फळांना सडवते, तिच्याकडे नसती आफत म्हणून आपण पाहात असलो तरी ती फार चतुर असते व तिचा मेंदूही तल्लख असतो. कुठलीही कृती करण्यापूर्वी फळमाशी विचार करते, असे ऑक्सफर्डच्या संशोधकांनी म्हटले आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील मेंदू वैज्ञानिकांनी याबाबतचे संशोधन केले असून कुठलेही अवघड निर्णय घेताना फळमाशी बराच काळ विचार करते.

फळमाश्यांवर करण्यात आलेल्या प्रयोगात त्यांना वासातील फरक ओळखण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्यावेळी त्यांनी या वासांना सरधोपटपणे प्रतिसाद दिला नाही, तर त्यातील पर्याय निवडताना त्यांनी संपूर्ण विचार केल्याचे दिसून आले. त्यांनी त्यापूर्वी बरीच माहिती गोळा केली हे त्यांच्या उच्च बुद्धिमत्तेचे लक्षण समजले जाते. माकडे किंवा माणूस यांच्या जवळपास जाणारी बुद्धिमत्ता त्यांना असल्याचे दिसून आले आहे. कुठल्याही गोष्टीवर अविचाराने प्रतिक्रिया न देता थांबून विचार करून प्रतिक्रिया देणे हे महत्त्वाचे असते तरच बोधन व बुद्धिमत्ता या दोन बाबी आपल्याला त्यात प्रतीत होतात, असे प्रा. गेरो मिसेबॉक यांनी सांगितले.



त्यांच्या मते फळमाशीमध्ये मेंदूची शक्ती आश्चर्यकारक असते.

पण, अजून त्याची ओळख पटली नव्हती. एफओएक्सपी हे जनुक फळमाशीच्या मेंदूतील २०० न्यूरॉन्समध्ये असते; त्याचा फळमाशीच्या मेंदूतील निर्णय प्रक्रियेशी संबंध असतो. ड्रासोफिला या फळमाशीवर केलेल्या प्रयोगात त्यांना एका खास कक्षात ठेवून वास ओळखण्यास प्रवृत्त केले गेले. त्यात असे दिसून आले की, त्यांच्या निर्णय क्षमतेची गणितीय प्रारूपे ही माकड व माणूस यांच्याशी साधर्म्य असलेली आहेत. 'सायन्स' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

# साबण नव्हता तेव्हा...

आपल्या दैनंदिन जीवनात काही वस्तूंचे स्थान अढळ आहे. त्यामध्ये साबणाचा समावेश होतो. आंघोळीसाठी आणि एरवीही हात-पाय किंवा चेहरा स्वच्छ धुण्यासाठी साबण हवा असतो. मात्र साबणाचा शोध लागण्यापूर्वी किंवा त्याचा असा वापर सुरू होण्यापूर्वी लोक स्वतःला कसे स्वच्छ ठेवत, याचा कधी विचार केला आहे का? अर्थातच संशोधक मंडळींना याबाबतचेही कुतूहल होते. त्याबाबतचाही काही मागोवा घेण्यात आलेला आहे.

साबणाचा शोध लागण्यापूर्वी शरीर स्वच्छ ठेवण्यासाठी अर्थातच पाण्याचाच सर्वाधिक वापर होत असे. सिंधू संस्कृतीमध्ये सार्वजनिक स्नानगृहे होती व तसे एक स्नानगृह मोहेंजोदाडो येथे सापडलेही आहे. सध्याच्या भारत, पाकिस्तान व अफगाणिस्तानच्या भागात चार-पाच हजार वर्षांपूर्वी ही संस्कृती नांदत होती. त्या काळातील लोकांनी सध्या पाकिस्तानात असलेल्या मोहेंजोदाडो येथे अत्यंत सुरेख असे सार्वजनिक स्नानगृह बांधले होते. स्टीम बाथिंगचे हे एक सर्वात जुने उदाहरण आहे. रोमन काळातील सार्वजनिक स्नानगृहेही युरोपमध्ये अनेक ठिकाणी आढळतात.

मात्र वैयक्तिक स्वच्छतेसाठी केवळ वाफेचे किंवा पाण्याचे स्नान पुरेसे नव्हतेच. मिसिसिपी स्टेट युनिव्हर्सिटीतील ज्युडिथ रिडनर यांनी सांगितले की, जुन्या काळात अनेक लोकांची वैयक्तिक स्वच्छता साबणासारख्या सुविधेच्या कमतरतेने कमीच असू शकते. साबणामध्ये जरी काही अतिरिक्त घटक असले तरी मूळ घटकांमध्ये पाण्यात विद्राव्य अशा अल्कली व फॅटचा समावेश असतो, असे अल्बानी स्टेट युनिव्हर्सिटीतील क्रिस्टाईन कोंकोल यांनी सांगितले. साबणाच्या रेणूंमध्ये पाण्याला आकर्षित करणारे मुख तसेच ग्रीस-तेल यांना आकर्षित करणारी कार्बन साखळी असते. ही साखळी घाणीच्या रेणूंभोवती गुंडाळली जाऊन त्यांना वर खेचून बाहेर काढते, असेही त्यांनी सांगितले.

हाच बेसिक फॉर्म्युला प्राचीन काळातील साबणासारख्या वस्तूंमध्ये वापरला जात असे. त्या काळातील अशा वस्तूंमध्ये वनस्पती, प्राणीजन्य घटक, तेल, वाळू किंवा लाकडाची राख असे घटक समाविष्ट होते. अर्थातच आधुनिक असो किंवा प्राचीन, साबण हा कालौघात नाश पावणारा पदार्थ असल्याने प्राचीन साबणांचा माग काढणे संशोधकांसाठी कठीणच आहे, असे नॉर्थ डकोटा स्टेट युनिव्हर्सिटीतील रासायनिक संशोधक सेथ रास्मसेन यांनी सांगितले.



# रद्दी पेपरनं पालटलं नशीब

पैसा, सोनं याची आवड कुणाला नसते? सर्वांनाच असते; पण ते सर्वांच्याच नशिबातही नसते. असते त्याच्याकडे भरपूर आणि नाही त्याच्याकडे काहीच नाही, असे कित्येकदा दिसून येते. पण, काही वेळा नशिबाची दारे उघडतात आणि असा चमत्कार घडतो की, काही क्षणात गरीबही श्रीमंत होतो. असाच चमत्कार एका मुलाच्या आयुष्यात घडला. मॅट विंटर असे या मुलाचे नाव आहे. कॅनब्रुक, कैंट येथील मॅट विंटर ११ वर्षांचा होता, त्यावेळी त्याने एका महिलेला कचरा पिशवी फेकताना पाहिले. पिशवीत काळे आणि पांढरे टाकाऊ कागद होते. मॅटने महिलेला विचारले की, तो हे पेपर घेऊ शकतो का? महिलेने होकार दिल्यानंतर त्याने नाईट, डेथ अँड द डेव्हिल डिझाईन असलेला एक पेपर स्वतःकडे ठेवला. त्याचा त्याला किती फायदा होणार आहे, याची कल्पना त्याला त्यावेळी नव्हती.




१३ वर्षांनंतर वयाच्या २४ व्या वर्षी मॅट विंटरला समजले की, त्याने लहानपणी जो पेपर उचलला, त्यावर जे पेंटिंग होते ते सामान्य अजिबात नव्हते. जर्मनीत जन्मलेल्या अल्ब्रेक्ट ड्युरर यांनी काढलेले ते पेंटिंग १५१३ मध्ये रेखाटण्यात आले होते.

डेली स्टारच्या रिपोर्टनुसार, रेनेसाँच्या काळात बनवलेल्या या पेंटिंगचा रेअर बुक ऑक्शन्सतर्फे लिलाव करण्यात येत आहे. रेअर बुक ऑक्शन्सचे संचालक जिम म्हणाले की, त्यांनी ते नीट तपासले आणि समजले की, ते पेंटिंग ड्युरेरशिवाय इतर कोणीही रेखाटलेले नसावे. या पेंटिंगचा लिलाव १८ सप्टेंबर रोजी होणार आहे. त्याची किंमत किमान २२ लाख रुपये असेल आणि ती प्रत्यक्ष लिलावात आणखी वाढू शकते.

# व्यायाम करण्यापूर्वी...

**संतुलित आहार आणि नियमित व्यायाम ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे; मात्र तयारीशिवाय व्यायाम करणे देखील तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. विशेषत: कोणत्याही तयारीशिवाय व्यायाम सुरू केल्यास हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यामुळे व्यायाम करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबाबतची ही माहिती...**

व्यायाम सुरू करण्यापूर्वी वॉर्मअप करणे खूप महत्त्वाचे आहे. वॉर्मअप केल्याने तुमच्या शरीराचे तापमान वाढते, स्नायू लवचिक होतात आणि हळूहळू तुमची हृदय गती वाढते. हे तुमचे शरीर व्यायामासाठी तयार होण्यास मदत करते आणि हृदयविकाराचा धोका कमी करते. तुम्हाला आधीच कोणत्याही आजाराने, विशेषत: हृदयविकाराने ग्रासले असल्यास, व्यायाम सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. तुमच्यासाठी कोणता व्यायाम सुरक्षित आहे आणि तुम्ही तो किती काळ करावा हे डॉक्टर तुम्हाला सांगतील. जर तुम्ही बऱ्याच काळापासून व्यायाम करत नसाल तर हळूहळू सुरुवात करा.



पहिल्या दिवशी जास्त व्यायाम करण्याचा प्रयत्न करू नका. तुमच्या व्यायामाचा कालावधी आणि तीव्रता हळूहळू वाढवा. व्यायाम करण्यापूर्वी आणि नंतर भरपूर पाणी प्या. पाणी तुमच्या शरीराला हायड्रेट ठेवते आणि शरीराचे तापमान नियंत्रित ठेवते. व्यायामासाठी सैल आणि आरामदायी कपडे घाला.

तुमच्या शरीराला श्वास घेता येईल असे कपडे घाला. व्यायाम करण्यासाठी सुरक्षित आणि स्वच्छ जागा निवडा. तुम्ही बाहेर व्यायाम करत असाल तर उन्हापासून बचाव करण्यासाठी टोपी घाला. आपल्या मर्यादा जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. व्यायाम करताना तुम्हाला वेदना किंवा अस्वस्थता जाणवत असल्यास, ताबडतोब थांबवा. व्यायाम संपल्यानंतर थंड होणे महत्त्वाचे आहे. कूल-डाऊन हळूहळू तुमच्या शरीराचे तापमान कमी करते आणि स्नायूंचा ताण कमी करते. नियमित व्यायाम केल्याने तुमचे शरीर तंदुरुस्त राहते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.

## दूषित पाणी : सहा जणांची प्रकृती गंभीर

# दोनशे जणांना विषबाधा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातून धक्कादायक माहिती येत आहे. येथील नेरली कुष्ठधाम येथे दूषित पाणी प्यायलयाने तब्बल दोनशेहून अधिक जणांना विषबाधा झाली आहे. यातील काही जणांची प्रकृती ही गंभीर झाली आहे. ही घटना शुक्रवारी रात्री घडली आहे. विषबाधा झालेल्या नागरिकांना तातडीने दवाखान्यात भरती करण्यात आले आहे. सार्वजनिक पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीतील पाणी प्यायल्याने नागरिकांना उलट्यासह चक्कर व डोकेदुखी होऊ लागली. अचानक मोठ्या प्रमाणात नागरिक आजारी पडल्याने त्यांना तातडीने दवाखान्यात भरती करण्यात आले आहे. या घटनेमुळे शुद्ध पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नांदेड जवळच असलेल्या नेरली कुष्ठधाम येथे काही नागरिकांना अचानक शुक्रवारी मध्यरात्री उलटी, जुलाब, डोके दुखणे, चक्कर येऊ लागले. सुरवातीला काही नागरिकांना त्रास झाला.

यानंतर अनेकांनी या प्रकारच्या त्रासाची तक्रार केली. अचानक आजारी नागरिकांची संख्या वाढू लागली. यातील काही जणांची प्रकृती ही गंभीर झाली. मध्यरात्री झालेल्या प्रकारामुळे खळबळ उडाली. आजारी नागरिकांना तातडीने रात्री १२ वाजता नांदेडमधील खासगी व शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व डॉक्टरांच्या पथकाने नेरली कुष्ठधाम येथे जात आजारी नागरिकांवर उपचार करण्यास सुरुवात केली. काही जणांची प्रकृती ही गंभीर होती. त्यामुळे त्यांना तातडीने दवाखान्यात भरती करण्यात आले.

काल शनिवार पहाटे चार वाजेपर्यंत तब्बल २०० रुग्णांना नांदेडच्या विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यामध्ये लहान मुळे, महिला आणि वृद्ध नागरिकांचा समावेश आहे.

स्थानिक नागरिकांनी सुरुवातीला त्यांच्या गाडीतून रुग्णांना दवाखान्यात दाखल केले. मात्र, आजारी व्यक्तिंची संख्यावाढल्यावर रुग्णवाहिका बोलावण्यात आली. तसेच आरोग्य पथक देखील दाखल झाले. तब्बल सात रुग्णवाहिका व खाजगी वाहनातून नागरिकांना दवाखान्यात भरती करण्यात आले. पोलिसांचे पथक देखील गावात दाखल झाले होते. त्यांनी देखील नागरिकांना दवाखान्यात नेण्यास मदत केली.

इन्फोग्राफिक्स

## भारताचे पाकिस्तानला प्रत्युत्तर

### इस्लामोफोबिया

**नवी दिल्ली** - संयुक्त राष्ट्राच्या महासभेच्या ७९ व्या सत्रात पाकिस्तानने नेहमीप्रमाणे भारताच्या विरोधात गरळ ओकली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारतात इस्लामोफोबिया वाढल्याचे सांगितले. यावर भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले. शुक्रवारी भारताकडून पाकिस्तानच्या आगळीकीला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. भारताच्या राजनैतिक अधिकारी भाविका मंगलानंदन म्हणाल्या की, जो देश लष्कराकडून चालविला जातो. ज्यांना जागतिक पातळीवर दहशतवाद, अंमली पदार्थांचा व्यापार आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीसाठी ओळखले जाते, त्या देशाने जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीवर हल्ला करण्याचे धाडस केले आहे. भाविका मंगलानंदन पुढे म्हणाल्या, "आज या महासभेत खेदजनक बाब घडली असून आपण त्याचे साक्षीदार आहोत. पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी भारताचा उल्लेख केला, त्याबद्दल मी बोलत आहे. पाकिस्तान आपल्या शेजारी देशाच्या विरोधात सीमे पलीकडून दहशतवादाचा वापर करत आहे, हे जागाला माहिती आहे. त्यांनी आमच्या संसदेवर, आर्थिक राजधानी मुंबईवर, बाजार आणि तीर्थयात्रेच्या मार्गावर हल्ले केले. ही यादी बरीच मोठी आहे. अशा देशाने हिंसाचारावर बोलणे म्हणजे यापेक्षा मोठे दांभिकतेचे उदाहरण असू शकत नाही." खरे सांगायचे तर पाकिस्तानला भारतीय भूभाग बळकविण्याची इच्छा आहे. त्यामुळेच भारताचा विभाज्य भाग असलेल्या जम्मू आणि काश्मीरमध्ये लोकशाही मार्गाने होत असलेल्या निवडणुकांमध्ये दहशतवादाचा वापर करून सातत्याने व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, असेही भाविका मंगलानंदन म्हणाल्या. पुढे पाकिस्तानला इशारा देताना त्यांनी म्हटले की, शेजारी देशाने हेही लक्षात घेतले पाहीजे की, भारताविरुद्ध सीमेपलीकडून होणारा दहशतवाद हा अपरिहार्य परिणामांना आमंत्रण देईल असे सांगितले.

» Selected

## अक्षय शिंदेच्या वडिलांची पोलीस संरक्षणाची मागणी

**नाशिक** : बदलापूर बलात्कार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी त्यांच्या कुटुंबांना धमक्या मिळत असल्याचा दावा करत पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आणि नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना पत्र लिहिले आहे. 'माझ्या मुलाची हत्या राजकीय फायद्यासाठी करण्यात आली. मला आणि माझ्या कुटुंबाला धमक्या मिळत आहेत, त्यांचे वकील अमित कटारनवरे आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही धमक्या मिळत आहेत. धोका लक्षात घेता या सर्वांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, असे सांगितले.

## एकाच कुटुंबातल्या पाच जणांचे मृतदेह

**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीत एकाच कुटुंबातल्या पाच जणांचे मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. पाच जणांचे मृतदेह दिल्लीतल्या रंगपुरी या ठिकाणी असलेल्या घरात आढळले आहेत. एका माणसाने त्याच्या चार मुलींसह विष मिसळलेला पदार्थ खाऊन आयुष्य संपवले आहे. पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत. रंगपुरी या भागात असलेल्या एका घरात पोलिसांना पाच मृतदेह आढळले आहेत. चार मृतदेह मुलींचे आहेत, एक मृतदेह माणसाचा आहे. चारही मुलींना विष देऊन या माणसाने आत्महत्या केली असावी असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या माणसाला ज्या चार मुली होत्या त्यातल्या मोठ्या मुलीला एका डोळ्याने दिसत नव्हतं. तर एका मुलीला चालण्याचा त्रास होता. या ठिकाणी सल्फाज चे पाऊच मिळाले आहेत. तेच मिसळून बहुदा या सगळ्यांचा मृत्यू झाला असावा हा पोलिसांचा अंदाज आहे.

## राज ठाकरे यांची सरकारवर खरमरीत टीका

# राज्यात नवे उद्योग आणा !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती:** जानेवारीत पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे राहणार नाहीत' असं राज ठाकरे म्हणाले."राज्य खड्ड्यात घातलं जात असेल तर ते चुकीचं आहे. महिलांना अशा प्रकारे पैसे न देता राज्यात नवीन उद्योग आणा" असे म्हणत राज ठाकरेंनी या योजनेवर अप्रत्यक्षरित्या टीका केली आहे. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना सध्या चांगलीच चर्चेत आहे.

लाडकी बहीण योजनेवरुन विरोधकांनी सातत्याने सरकारवर टीका केली आहे. या योजनेच्या अंतर्गत पात्र महिलांना महिन्याचे १५०० रुपये दिले जातात. सरकारकडून मतांसाठी ही लाच दिली जाते आहे

अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे. तसंच उद्धव ठाकरे, शरद पवार, प्रणिती शिंदे, नाना पटोले यांनीही आत्तापर्यंत अनेकदा या लाडकी बहीण योजनेवरुन महायुतीवर टीका केली आहे.

आता राज ठाकरे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना लाडकी बहीण योजनेवरुन टीका केली आहे.

राज ठाकरे यांच्या वक्तव्यानंतर महायुतीमधल्या नेत्याने त्यांना प्रत्युत्तर देत पलटवार केला आहे. ' ज्यांच्या पोटात दुखतं तेच अशी वक्तव्य करतात' असं म्हणत महायुतीमधील अजित पवार गटातील नेते प्रफुल्ल पटेल यांनी राज ठाकरेंवर टीका केली. आमच्या सर्व बहिणी आमचं स्वागत करत आहेत, असेही ते म्हणाले.

### काय म्हणाले राज ठाकरे?

- ऑक्टोबरचा पहिला हप्ता दिल्यानंतर जानेवारी महिन्यात पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे नसणार.
- सत्ताधाऱ्यांच्या स्वार्थासाठी योजना तयार केल्या जात असतील तर त्याचा राज्यावर परिणाम होईल.
- राज्य खड्ड्यात घातलं जात असेल तर हे चुकीचं आहे.
- महिलांना अशा प्रकारे पैसे न देता राज्यात नवीन उद्योग आणले पाहिजे, रोजगार दिला पाहिजे.
- समाजातील कोणताही घटक फुकट काही मागत नाही.

## क्रीडा शिक्षकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** सातारा शहरात एक धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. शहरातील एका शाळेतील क्रीडा शिक्षकाने अल्पवयीन मुलीची छेड काढत तिचा अनेकवेळा विनयभंग केल्याचा प्रकार घडला आहे.'माझं तुझ्यावर प्रेम आहे. मोबाईलमधील फोटो टेलिग्रामवर पाठव', असे म्हटल्याने शिक्षकाविरुद्ध पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सौरभ रामचंद्र शर्मा (वय ३०, रा. मंगळवार तळे, सातारा) असे या शिक्षकाचे नाव आहे.विनयभंगाची ही घटना ऑगस्टपासून वेळोवेळी घडली आहे. तक्रारीत मुलीने म्हटले आहे की, शाळेत असताना स्टाफरूममध्ये कोणी नसताना शिक्षकाने बोलावून 'माझे तुझ्यावर प्रेम आहे', असे म्हणत विनयभंग केला.

# ८१० जोडपी अनुदानाच्या प्रतीक्षेत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपूर : जातीय बंधनाची बेडी तोडून राज्यात सलोखा नांदावा, याकरिता आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ५० हजारांचे अनुदान दिले जाते. मात्र, नागपूर जिल्ह्यात ८१० जोडप्यांनाही अद्यापही अनुदानाची प्रतीक्षा आहे. सरकारलाच आंतरजातीय विवाह नको असल्याचे निधी धोरणांवरून दिसून येते.

आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी अनुदानाची योजना ३ सप्टेंबर १९५९ पासून सुरू झाली. जातीयता नष्ट करण्यासाठी या योजनेचे योगदान आहे.

राज्य शासनाने ३० जानेवारी १९९९ मध्ये या योजनेच्या अनुदानात वाढ केली. त्यानंतर १५ हजार रुपये आर्थिक साहाय्य देणे सुरू केले. ओडिशा, उत्तरप्रदेश, चंदीगड, गुजरात, हरियाणा, मध्यप्रदेश आदी राज्यांत अशा जोडप्यांना ५० हजारांपर्यंत अनुदान देण्यात येते. याच धर्तीवर राज्यात १ फेब्रुवारी २०१० पासून आंतरजातीय विवाहांसाठीचे ५० हजारांचे अनुदान देण्यात येते. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ही योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येते. योजनेत अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यापैकी एक व्यक्ती आणि दुसरी व्यक्ती सवर्ण म्हणजे हिंदू, जैन, लिंगायत, शीख या धर्मातील असेल तर त्या विवाहास आंतरजातीय विवाह म्हणून संबोधण्यात येत होते.

योजनेचा लाभ घेण्यासाठी विवाहितांनी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकारी कार्यालयात विहित नमुन्यातील अर्ज करावा लागतो. अर्जासोबत विवाह नोंदणी दाखला, वधू-वर यांचा शाळा सोडल्याचा दाखला आणि वधू-वरांच्या जातीच्या दाखल्याच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. आंतरजातीय विवाहाची नोंदणी संबंधित विवाह नोंदणी अधिकाऱ्याकडे करणे आवश्यक आहे.

## काँग्रेसची मागणी : विधानसभा निवडणूक

# वाई, कराड दक्षिण, माण आम्हाला द्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय काँग्रेसनेही जोरदार तयारी केली असून, केंद्रीय निरीक्षकांनी जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला. यामध्ये पदाधिकाऱ्यांनी माण, वाई आणि कराड दक्षिण मतदारसंघ काँग्रेसकडे घेण्याची जोरदार मागणी केली. यामुळे महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा तिढा सुटणार कसा, असा प्रश्न निर्माण होणार आहे.

साताऱ्यातील काँग्रेस कमिटीत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडून नियुक्त निरीक्षक आणि कर्नाटकातील माजी मंत्री विनयकुमार सोरके यांनी आढावा बैठक घेतली. या वेळी जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, महिला जिल्हाध्यक्षा अल्पना यादव, जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई, अजित पाटील, धनश्री महाडिक, रजनी पवार आदी उपस्थित होते.

बैठकीत निरीक्षक सोरके यांनी सातारा लोकसभा मतदारसंघातील साताऱ्यासह वाई, कोरेगाव, कराड उत्तर, कराड दक्षिण आणि पाटण विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेतला. या वेळी पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यात काँग्रेसची ताकत वाढलेली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत कराड दक्षिण मतदारसंघ काँग्रेसकडे राहील. परंतु माण आणि वाई मतदारसंघही मिळावा, अशी जोरदार मागणी केली.

यावर निरीक्षक सोरके यांनी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला यश मिळवायचे असेल, तर घराघरांतील माणूस पक्षाशी जोडायला हवा. बूथ कमिट्या आणखी बळकट कराव्यात, अशी सूचना केली. त्याचबरोबर जिल्ह्यातील तीन मतदारसंघ मिळण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडे प्रयत्न करण्यात येतील, असेही स्पष्ट केले.

### राष्ट्रवादीची सात जागांची तयारी

- विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने जिल्ह्यातील इच्छुकांकडून अर्ज मागणी केली होती. त्यानंतर कराड दक्षिण वगळता इतर सात मतदारसंघांसाठी २९ जणांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी केलेली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत कोणाच्या वाट्याला किती मतदारसंघ येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## भारतीय लेखिकेला लंडनमध्ये मारहाण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लंडन :** भारतीय लेखिका सौंदर्या बालसुब्रमणी यांना लंडन या ठिकाणी मारहाण करण्यात आली आहे. त्यांचं नाक फ्रॅक्चर झालं आहे. तसंच त्यांनी एक डोळा जवळपास गमावला आहे. लंडन येथील रस्त्यावर त्यांना अमानुष मारहाण करण्यात आली. या घटनेचा अनुभव त्यांनी सांगितला आहे. १८ सप्टेंबरच्या दुपारी मी लंडन येथील रस्त्यावरुन चालले होते. तेवढ्यात एक धिप्पाड माणूस तिथे आला. तो मला म्हणाला तुम्ही मला काही पैसे देऊ शकता का? मी त्याला नकार दिला, तेव्हा त्याने माझ्या चेहऱ्यावर ठोसे मारले. माझं नाक त्याचवेळी फ्रॅक्चर झालं आणि रक्त वाहू लागलं. काही सेकंदांसाठी मला काय घडलं ते कळलंच नाही. मी जेव्हा स्वतःकडे पाहिलं तेव्हा माझा शर्ट रक्ताने माखला होता. तसंच रस्त्यावरही रक्त सांडलं होते. माझ्या नाकातून रक्त वाहात होतं. मी इतक्या मोठ्या प्रमाणावर रक्त याआधी कधीही पाहिलेले नसल्याचे सांगितले.

## आयफोन प्लांटला भीषण आग

पंढरी संचार छायाचित्रसेवा



कंपनीच्या मोबाईल फोन एक्सेसरीज पेंटिंग युनिटमध्ये पहाटे साडेपाच वाजता आग लागली. आग लागल्यानंतर संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले होते. कर्मचारी व स्थानिक लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सर्व कर्मचाऱ्यांना कंपनीतून बाहेर काढण्यासाठी सात अग्निशमन गाड्या तैनात करण्यात आल्या होत्या. आतापर्यंत कोणीही जखमी झाले नाही. ही दिलासादायक बाब आहे.

**100हून अधिक पोलिस तैनात :** टाटा ग्रुपच्या एका प्लांटला भीषण आग लागली आहे. तामिळनाडूतील कृष्णगिरी जिल्ह्यातील होसूरजवळील टाटा इलेक्ट्रॉनिक्स प्लांटमध्ये ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. या टाटा इलेक्ट्रॉनिक्स प्लांटमध्ये आज सकाळी आग लागली. आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. अग्निशमन दलाच्या गाड्या आग विझवण्यासाठी आणि मदतीसाठी हजर आहेत.

## २१,००० हून अधिक मुलींसाठी शिष्यवृत्ती

# महिला सबलीकरणाप्रती उद्दिष्ट केले दृढ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भारतातील आघाडीचा विविध व्यवसाय समूह मलाबार ग्रुपने मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) भारत डायमंड बोअर्समध्ये झालेल्या एका समारंभात आपला राष्ट्रीय शिष्यवृत्ती कार्यक्रम जाहीर केला. मलाबार ग्रुप ही मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पालक कंपनी आहे. या घोषणेमुळे समूहाच्या फ्लॅगशिप सीएसआर उपक्रमातील एक लक्षणीय टप्पा गाठला गेला आहे. मलाबार स्कॉलरशिप प्रोग्राममुळे मुलींच्या शिक्षणाला सहाय्य करण्याप्रती कंपनीची बांधिलकी दिसून येते.

या सोहळ्याचे उद्घाटन माननीय वाणिज्य व उद्योग मंत्री श्री. पीयूष गोयल यांच्या हस्ते झाले. त्यावेळी एम. पी. अहाम्मद (अध्यक्ष- मलाबार ग्रुप), अशेर ओ (व्यवस्थापकीय संचालक- इंडिया ऑपरेशन्स, मलाबार ग्रुप) आणि अब्दुल सलाम के पी (उपाध्यक्ष- मलाबार ग्रुप), निषाद एके (कार्यकारी संचालक, मलबार ग्रुप) आणि शौनक पारीख (संचालक, महेंद्र ब्रदर्स) यांच्यासह कंपनीतील अनेक उच्चपदस्थ अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावर्षी शिष्यवृत्ती कार्यक्रमाद्वारे भारतभरातील २१,००० हून अधिक मुलींच्या शिक्षणासाठी १६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मलाबार ग्रुपचे अध्यक्ष एमपी अहमद या उपक्रमाबद्दल म्हणाले, "शिक्षण हे जग बदलण्यासाठी सर्वात शक्तिशाली साधन आहे. शिक्षण संधी खुल्या करते आणि आयुष्यामध्ये कायापालट घडवून आणते यावर मलाबार ग्रुपचा सखोल विश्वास आहे आणि त्याचे थेट प्रतिबिंब आमच्या शिष्यवृत्ती कार्यक्रमात दिसून येते. तरुण मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करण्यासाठी आम्ही बांधील असल्याचे सांगितले.

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जिल्हा रुग्णालय तसेच ग्रामीण रुग्णालयात

# रक्तवाहिन्यातील गाठ विरघळविणारा उपचार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जिल्हा रुग्णालय तसेच ग्रामीण रुग्णालयात आता हृदयविकाराच्या रुग्णांना हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमधील गाठ विरघळविणारे औषध व इंजेक्शन मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जागतिक हृदयविकार दिनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत आहे.

हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांसाठी पहिले काही तास हे अत्यंत मोलाचे असतात. या काळात योग्य उपचार मिळाल्यास रुग्णाचा जीव वाचू शकतो. यासाठी रुग्णालयात कॅथलॅब तसेच हृदयशस्त्रक्रियेची व्यवस्था असणे आवश्यक असते. ग्रामीण भागात अशी खार्चिक व्यवस्था फारशी नसल्याच्या पार्श्वभूमीवर हृदयविकाचा झटका आलेल्या थ्रॉम्बोसिसच्या उपचारात म्हणजे रक्तवाहिन्यातील गुठळी विरघळविणारे प्रभावी औषध 'टिनेक्टिप्लेज' उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामुळे रुग्णाला पुढील उपचारासाठी पुरेसा वेळ मिळू शकणार आहे. खाजगी रुग्णालयात या उपचाराचा खर्च औषध व इंजेक्शनसह किमान ५० ते ७० हजार रुपये येत असून आरोग्य विभागाच्या रुग्णालयात हे औषध मोफत देण्यात येणार असल्याचे आरोग्य संचालक डॉ स्वप्निल लाळे यांनी सांगितले. मधुमेह, उच्च रक्तदाब, ताणतणाव तसेच खाण्यापिण्याच्या अयोग्य सवयींमुळे गेल्या काही दशकात भारतात हृदयविकाराच्या रुग्णांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटेच्या २०२२ च्या अहवालानुसार ३२ टक्के मृत्यू हे हृदयविकार व रक्तवाहिन्यांच्या आजाराशी संबंधित आहेत. भारतात २०२० च्या एका अहवालानुसार देशात ७.५ टक्के मृत्यू हृदयविकाच्या झटक्याने होतात तर हेच प्रमाण महाराष्ट्रात ८.९ टक्के इतके आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या आरोग्य विभागाने फेब्रुवारी २०२१ पासून 'स्टेमी' प्रकल्प (एसटी एलिव्हेशन इन मायकार्डियल इन्फाक्शन) उपक्रम १२ जिल्ह्यात सुरु केला होता. या अंतर्गत इसीजी काढण्यात येतो तसेच त्यातून आढळणार्या रुग्णांवर उपचाराची व्यवस्था केली जाते.

एप्रिल २०२४ पासून आरोग्य विभागाने स्टेमी प्रकल्पाची उपयुक्तता लक्षात घेऊन तो २२ जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये तसेच ग्रामीण रुग्णालयात राबविण्यास सुरुवात केली आहे.

- जागतिक हृदयविकार दिनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये म्हणजे जेथे अतिदक्षता विभाग आहे तसेच एमडी मेडिसीन वा हृदयशल्यविशारद आहे अशा रुग्णालयात हृदयविकाराचा त्रास असलेल्या रुग्णांच्या रक्तवाहिनीतील गाठ विरघळविणारे टिनेक्टिप्लेज हे औषध देणार आहोत. त्यामुळे अँजिओप्लास्टी वा बायपास उपचार करण्यासाठी रुग्णाला अवधी मिळणार आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाच्या रुग्णालयांध्ये २३ ठिकाणी कॅथलॅब बसविण्यात येणार असून त्यामुळे ग्रामीण भागातील हृदयविकाराच्या रुग्णांना अधिक जवळ अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टीची सुविधा उपलब्ध होईल असे आरोग्य संचालक डॉ लाळे यांनी सांगितले.

# SPORTS

# पावसाची बॅटिंग




## भारत-बांगलादेश टेस्ट-पावसामुळे दुसऱ्या दिवशीचा खेळ रद्द

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** भारत-बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द करण्यात आला आहे. शनिवारी सकाळपासून कानपूरमध्ये अधूनमधून पाऊस पडत आहे. अशा स्थितीत पंचांनी मैदानावरील कर्मचाऱ्यांशी बोलून दिवसाचा खेळ रद्द करण्याचा निर्णय घेतला. रविवार, 29 सप्टेंबर रोजीही येथे पावसाची 59% शक्यता आहे.

शुक्रवारी 27 सप्टेंबर रोजी सामन्याच्या पहिल्या दिवशीही पावसामुळे स्टंप लवकर करण्यात आले. केवळ 35 षटके खेळता आली. साधारणपणे एका दिवसात 90 षटके टाकली जातात. दिवसाचा खेळ संपेपर्यंत बांगलादेशने 3 गडी गमावून 107 धावा केल्या होत्या. मोमिनुल हक 40 आणि मुशफिकर रहीम 6 धावा करून नाबाद माघारी परतले.

### पहिल्या दिवशी केवळ 35 ओव्हर टाकता आल्या

2 सामन्यांच्या मालिकेत भारत 1-0 ने आघाडीवर आहे. ग्रीन पार्क स्टेडियमवर टीम इंडियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशचा कर्णधार नझमुल हुसेन शांतो 31 धावा करून बाद झाला. त्याला रविचंद्रन अश्विनने एलबीडब्ल्यू केले. त्याने शांतो आणि मोमिनुलची पन्नासची भागीदारी तोडली. तत्पूर्वी आकाश दीपने शादमान इस्लाम (24 धावा) आणि झाकीर हसन (0) यांना बाद केले.

## भारतीय खेळाडू सरफराजच्या क्रिकेटर भावाचा अपघात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊ:** भारतीय क्रिकेटपटू सरफराज खानचा भाऊ मुशीर खान याचा अपघात झाला आहे. तो त्याचे वडील नौशाद खान यांच्यासोबत इराणी चषक स्पर्धेत भाग घेण्यासाठी आझमगडहून फॉर्च्युनर कारमधून लखनऊला जात होता. सर्व जखमींना लखनऊच्या मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मेदांताचे दिग्दर्शक राकेश कपूर यांनी सांगितले - 'मुशीरच्या मानेला दुखापत झाली असून तो धोक्याबाहेर आहे. त्याला कोणतीही गंभीर दुखापत नाही, त्याला फक्त फिजिओथेरपीची गरज आहे. एक-दोन दिवसांत त्याला डिस्चार्ज मिळेल. मुशीरची फॉर्च्युनर कार पूर्वांचल द्रुतगती मार्गावर दुभाजकाला धडकल्याने उलटली. मुशीरच्या मानेजवळ खांद्याला दुखापत झाली. सध्या त्याची प्रकृती धोक्याबाहेर आहे. मुशीरचे मामा शकील आणि UPCA सचिव अंकित चॅटर्जी यांनी या माहितीला दुजोरा दिला आहे.



### शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे आयोजित टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत

## त्रिशिक वाकलकर, आश्रित मज्जी, सर्वज्ञ सरोदे, अथर्व डाकरे यांची आगेकूच

**पुणे :** शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने आयोजित एमएसएलटीए शेपिंग फाऊंडेशन पुणे पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज 16 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या गटात त्रिशिक वाकलकर, आश्रित मज्जी, सर्वज्ञ सरोदे, अथर्व डाकरे राम मगदुम यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली. म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती टेनिस संकुलात आजपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत मुलांच्या गटात पहिल्या पात्रता फेरीत महाराष्ट्राच्या त्रिशिक वाकलकरने नील बोंद्रेचा 6-1, 6-1 असा तर, सर्वज्ञ सरोदे याने लेश्या नायडूचा 6-3, 6-0 असा सहज पराभव केला. चुरशीच्या लढतीत आश्रित मज्जी याने निलय ढवळेचा 1-6, 6-4, 10-8 असा तीन सेटमध्ये पराभव केला. राम मगदुम याने विवान मल्होत्रावर 6-3, 6-0 असा विजय मिळवला. अथर्व डाकरेने पृथ्वीराज चव्हाणचा 6-0, 6-0 असा एकतर्फी पराभव करून आगेकूच केली.

### पुण्याचा लौकिक पिसे व प्राप्ती बालवडकर

## महाराष्ट्राच्या सब ज्युनिअर टेनिक्वाईट संघात



**पुणे :** पुण्याचा लौकिक पिसे व प्राप्ती बालवडकर महाराष्ट्राच्या सब ज्युनिअर टेनिक्वाईट संघात, तसेच वाशिम चा उत्कर्ष पुणेवार व नागपूरची एकता काळे संघाच्या कर्णधार पदी निवड झाली आहे. दिनांक 30 सप्टेंबर ते 4 ऑक्टोबर 2024 दरम्यान जम्मू येथे होणाऱ्या टेनिक्वाईट फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित 36 व्या सब ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघ जाहीर झाला आहे. नुकत्याच बारामती येथे झालेल्या राज्य स्पर्धेतून निवडलेल्या खेळाडूंमधून प्रशिक्षण शिबीर होऊन महाराष्ट्राचा संघ जाहीर करण्यात आला. निवडलेला राष्ट्रीय संघ जम्मू येथील राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. मुलांच्या संघाच्या कप्तानपदी उत्कर्ष पुणेवार तर मुलींच्या संघाच्या कर्णधार पदी एकता काळे यांची निवड झाली.

**निवड झालेल्या संघ पुढीलप्रमाणे.**

**मुले-** 1) उत्कर्ष पुणेवार ,वाशिम( कप्तान), नैतिक वर्मा -वाशिम, यश मेश्राम -भंडारा, साई ईश्वर चव्हाण -नांदेड, कृष्णा चिलेवार -वाशिम, लौकिक पिसे -पुणे, संघ व्यवस्थापक -यशवंत वेदपाठक (पुणे ), प्रशिक्षक -महेश पोहेरवार( नागपूर).

**मुली-** एकता काळे -नागपूर ग्रामीण (कप्तान), मनस्वी ताठे -वाशिम, इशिका मिश्रा- वाशिम, अंकिता बोंबाटे- नागपूर ग्रामीण, आस्था मिश्रा -वाशिम, प्राप्ती बालवडकर -पुणे, संघ व्यवस्थापक- चंद्रकांत पिंपळे (पुणे), प्रशिक्षक- स्नेहा खोंड (नागपूर) .

### पीवायसी हिंदू जिमखाना आयोजित

## बॅडमिंटन साखळी स्पर्धेत कॅप्स रेव्हन्स संघाची आगेकूच कायम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने आयोजित दहाव्या पीवायसी-ट्रूस्पेस करंडक बॅडमिंटन साखळी स्पर्धेत साखळी फेरीत कॅप्स रेव्हन्स संघाने सलग दुसऱ्या विजयासह आपली विजयी मालिका कायम राखली.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत केदार नाडगोंडे, तन्मय चोभे, संस्कृती जोशी, सुचित्रा जोशी, अजय पटवर्धन, देवेंद्र राठी, अजिंक्य मुठे, विष्णू गोखले यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर कॅप्स रेव्हन्स संघाने ईगल्स संघाचा 4-3 असा पराभव करून दुसरा विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात ब्लॅक हॉक्स संघाने बदामीकर बझ्ईस संघाचा 5-2 असा सहज पराभव करून पहिला विजय मिळवला.

ब्लॅक हॉक्सकडून सिद्धार्थ साठे, राधिका इंगळहळीकर, हर्षद जोगाईकर, तन्मय आगाशे, गंधार देशपांडे, मधुर इंगळहळीकर, ईशा साठे, ईशा घैसास, चिन्मय जोशी, हेमंत करमरकर यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. अन्य लढतीत अदिती रोडे, श्रीदत्त शानबाग, दीप्ती सरदेसाई, प्रीती सप्रे, नीलेश केळकर, देवराज शहाणे, सोहम जोशी, गौतम लोणकर यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर रावेतकर कॉमेट्स संघाने फिनिक्स संघाचा 4-3असा पराभव करून विजयी सुरुवात केली.

## चैतन्याच्या मविआ मनियारची विभागस्तरीय कबड्डीसाठी निवड




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** पुणे जिल्हा क्रीडा परिषद,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे, खेड तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय व खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटना रामभाऊ म्हाळगी विद्यालय,कडूस (ता.खेड) येथे दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा आयोजित केल्या होत्या या जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेमध्ये चैतन्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावला. ओतूर येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयाने यापूर्वी १४ वर्षाखालील गटामध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळवला होता. जिल्हास्तरावर या संघाने तृतीय क्रमांक मिळवल्याची माहिती संघ व्यवस्थापक अमित झरेकर यांनी दिली.

या संघातील एक खेळाडूची मवीआ रियाज मानियार याची पुढील विभागस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी मनियार व इतर खेळाडूंचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



## न्यूझीलंड ८८ धावांवर ऑलआऊट

**मुंबई :** न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी न्यूझीलंड 88 धावांवर ऑलआऊट झाला. कालच्या स्कोअर 22/2 ने गॉल संघाने शनिवारी खेळण्यास सुरुवात केली. डावखुरा फिरकी गोलंदाज प्रबथ जयसूर्याने 6 बळी घेतले. न्यूझीलंडचे केवळ 3 फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले. तत्पूर्वी, श्रीलंकेने पहिला डाव 602/2 धावांवर घोषित केला. या जोरावर संघाला 514 धावांची आघाडी मिळाली आहे. कर्णधार डी सिल्वाने न्यूझीलंडला फॉलोऑन दिला आहे. दुसऱ्या डावात न्यूझीलंडने 1 गडी गमावून 3 धावा केल्या आहेत. श्रीलंकेकडून कामिंदू मेंडिसने 182 धावांची नाबाद खेळी खेळली, यासह त्याने कसोटीत 1000 धावाही पूर्ण केल्या. कामिंदू त्याच्या कारकिर्दीतील केवळ 13वी इनिंग खेळत आहे. सर्वात कमी डावात 1000 कसोटी धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये तो ऑस्ट्रेलियाच्या डोनाल्ड ब्रॅडमनच्या बरोबरीने पोहोचला.

### दुर्गा स्पोर्ट्स अकादमीने पटकावले पीडीएफए थर्ड डिव्हिजनचे जेतेपद

## अंतिम फेरीत ईगल्स एफसीला हरवून प्रथमच उंचावली ट्रॉफी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दुर्गा स्पोर्ट्स अकादमीने अखेर पूना जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या (पीडीएफए) थर्ड डिव्हिजनचे विजेतेपद पटकावले.

गंगा लिजेंड्स, बावधन मैदानावर खेळल्या गेलेल्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दुर्गा स्पोर्ट्स अकादमीने मध्यंतरानंतर दोन गोल करताना ईगल्स एफसीचे आव्हान 2-0 असे मोडून काढताना पहिल्यांदा ट्रॉफी उंचावली.

पहिला गोल नेल्सन पास्टेने (47व्या) केला. त्यानंतर तुषार दुर्गाने (58व्या मिनिटाला) त्यात भर घातली. 2024 हंगामात दुर्गा स्पोर्ट्स अकादमीने सांघिक कामगिरीमध्ये कमालीचे सातत्य राखले. यंदा प्रतिस्पर्ध्यांवर 27 गोल करताना केवळ एकच गोल स्वीकारला (कन्सीड) आहे.

दुर्गा स्पोर्ट्स अकादमीने मागील हंगामात पदार्पणात थर्ड डिव्हिजनच्या उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली होती. पीडीएफए लीगमध्ये नोंदणी केल्यानंतर दुसऱ्याच वर्षी त्यांनी जेतेपदावर मोहोर उमटवली. दुर्गा एसए हा क्लब गेल्या 12 वर्षांपासून अस्तित्वात असून एक अकादमी म्हणून कार्यरत आहे.

### १८ हँडिकॅपसह ४२ गुण मिळवून विजेतेपद

## सीटी पंडोल अँड सन्स गोल्फ कप २०२४ स्पर्धेत जगदीप सिंगला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सीटी पंडोल अँड सन्स आणि ओमेगा वॉचेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सीटी पंडोल अँड सन्स गोल्फ कप २०२४ स्पर्धेत जगदीप सिंग याने विजेतेपद संपादन केले.

पुण्याच्या पूना गोल्फ कोर्सवर झालेल्या या स्पर्धेत जगदीप सिंग यांनी १८ हँडिकॅपसह ४२ गुण मिळवून विजेतेपद पटकावले. सिंग यांनी १०व्या होलवर बर्डी केली आणि पाच पार्स मिळवत एकदिवसीय स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. स्टेबलफोर्ड फॉरमॅटमध्ये खेळविलेल्या या स्पर्धेत एकूण ९१ गोल्फर सहभागी झाले होते.




स्पर्धेच्या दिवशी उत्तम हवामान आणि मैत्रीपूर्ण स्पर्धेचा अनुभव होता. सहभागी गोल्फपटूनी सीटी पंडोल अँड सन्सच्या उत्तम आतिथ्याचे आणि निर्दोष आयोजनाचे कौतुक केले. सर्व व्यवस्था, टी-ऑफपासून ते भव्य पारितोषिक वितरण सोहळ्यापर्यंत, अत्यंत शिस्तबद्ध होती. पारितोषिक वितरण समारंभात कावास पंडोल यांच्या उपस्थितीत, होरमुझ पंडोल आणि ओमेगा इंडियाचे सुमित के शर्मा यांनी पारितोषिक वितरण केले.

कार्यक्रमाच्या यशानंतर कावास पंडोल म्हणाले, "ओमेगासोबत ही स्पर्धा आयोजित करणे हा एक आनंददायक अनुभव होता. गोल्फच्या अचूकते आणि ओमेगाच्या घड्याळांच्या उत्कृष्टतेमधील समन्वय अद्वितीय आहे. आम्ही पुढील वर्षी पुन्हा या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी उत्सुक आहोत."

सीटी पंडोल अँड सन्स पुढील आठवड्यात आपली ११६ वी वर्धापन दिन साजरा करण्याची तयारी करत आहेत, आणि हा गोल्फ स्पर्धा त्यांच्या समृद्ध परंपरेत आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा जोडतो. शंभराहून अधिक वर्षांपासून, सी टी पंडोल अँड सन्स हे लक्झरी आणि कौशल्य यांचे प्रतीक आहे, ज्यांनी प्रतिष्ठित घड्याळांची एक उत्कृष्ट श्रेणी सादर केली आहे. त्यांच्या गुणवत्तेच्या आणि वैयक्तिक सेवेसाठीच्या वचनबद्धतेमुळे ते पुण्यातील लक्झरी घड्याळांचे प्रमुख ठिकाण बनले आहेत. ही स्पर्धा सी टी पंडोल अँड सन्स, भारतातील सर्वात जुने लक्झरी वॉच रिटेलर आणि ओमेगा वॉचेस यांच्या संयुक्त विद्यमाने प्रायोजित करण्यात आली होती, ज्यांनी क्रीडा आणि लक्झरी यांच्या साजेश्या अनुभवाची परंपरा पुढे चालू ठेवली.

- स्पर्धेचे निकाल:
  एकूण विजेता: जगदीप सिंग (४२ गुण)
- इतर विजेते:
- हँडिकॅप १९ आणि त्याहून अधिक विजेता: आदित्य मिश्रा (३९ गुण)
- हँडिकॅप १९ आणि त्याहून अधिक उपविजेता: तृप्ती अभ्री (३७ गुण)
- हँडिकॅप १३ ते १८ विजेता: विकास शेवारे (३९ गुण)
- हँडिकॅप १३ ते १८ उपविजेता: हितेंद्र यादव (३८ गुण)
- हँडिकॅप ० ते १२ विजेता: अमन सिवाच (३९ गुण)
- हँडिकॅप ० ते १२ उपविजेता : यश वाधवान (३६ गुण)